वंगजागृति.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी,
गिरगांव—मुंबई.

०—४—०.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीची पुस्तकमाला.

पुस्तक १८ वें.

वंगजागृति

अथवा

जागा झालेला बंगाल.

हें

स्वदेशी चळवळीसंबंधीचें नाटक,

(बंगाली पुस्तकावरून)

श्रीयुत काशीनाथ रघुनाथ मित्र,

यांनीं लिहिलें.

(प्रथमावृत्ति)

मुंबई,

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी.

मार्च १९०६.

मुंबई–गिरगांव–येथें,

'**कर्नाटक**' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

दोन शब्द.

प्रस्तुत पुस्तक, वंगबंधु श्रीयुत हरनाथ बसु, यांच्या **'जागरण'** नामक बंगाली नाटकाची प्रतिकृति आहे. बंगाल्यांत या नाटकाचे प्रयोग सांप्रत होत असून तिकडे हें बरेंच लोकप्रिय झालें आहे.

स्वदेशी चळवळीसंबंधीं बंगाल्यांत सुरू असलेले प्रयत्न, आणि वंगबंधूंचे विचार यांच्या दिशेची कल्पना आमच्या महाराष्ट्रबंधूंस व्हावी, व बंगाल्याप्रमाणें महाराष्ट्रांतहि **स्वदेशी चळवळ** नेटानें चालविण्यास लोकांची हुरूप वाढावी, एवढयाच हेतूनें हा अल्प प्रयत्न केला आहे. 'सत्यसंकल्पाचा दाता भगवान सर्व मनोरथ पूर्ण करो !'

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीचें
कार्यालय, गिरगांव–मुंबई,
ता. १ मार्च १९०६.

काशीनाथ रघुनाथ मित्र.

नाटकांतील पात्रें.

पृथ्वीश्वर चौधुरी.	(नामधारी राजा.) चुनागल्लीचा राजा व पलाशपूरचा जमीदार.
पुरुषोत्तम.	नामधारी राजाचा खुषामत्या.
डेव्हीस.	,, मित्र.
निकोलस.	,, ,,
प्रेमानन्द.	पलाशपूरचा एक श्रीमान गृहस्थ.
सनत्कुमार.	,, ,, दरिद्री गृहस्थ.
इन्दुमती.	नामधारी राजाची राणी.
अरुन्धती.	इन्दुमतीची मैत्रीण.
क्षीरोदा	,, दासी.
अन्नपूर्णा.	प्रेमानन्दाची आई.
सरोजिनी.	,, पत्नी.

यांशिवाय नामधारी राजाचा दिवाण, गुरु, मुसलमान फकीर, तरुण मंडळी, दरवडेखोर, शाळेंतील विद्यार्थी, मास्तर, नोकर, पहारेकरी, सभासद, आणि कलावंतिणी, परिचारिका, इत्यादि इत्यादि.

वन्दे मातरम् !

वंगजागृति

अथवा

जागा झालेला बंगाल.

[प्रवेशक.]

सर्व पात्रें—

गीत.

[चाल—जयति जय सुरसरित्०]

प्रणति तुज भरतभूजननि शुभदायिनी ॥ ध्रु० ॥
शक्तिगुणवैभवा । तव यशोगौरवा ।
तेविं ओजा नवा । कवण वर्णिल भुवनिं ॥ १ ॥
भिन्नधर्मा मता । बहुविधा देवता ।
अर्पिती सबलता । तुजसि निजनिजगुणीं ॥ २ ॥
रामनलशिवनृपति । बुद्धशंकर सुमति ।
पार्थगांगेयतति । तनय तव वीरमणि ॥ ३ ॥
विपुलविभवान्विता । तूं, परी तव सुतां ।
गांजिती कां वृथा । दुःखदुर्गति जनीं ? ॥ ४ ॥
सकलही सुरगणीं । पूज्यतम तूं असुनि ।
तुजसि अवमानुनी । पातलों या व्यसनिं ॥ ५ ॥
आमुचा रव करुण । परिसितां द्रवुनि मन ।
लव विलंब न करुन । येसि झणिं धावुनी ॥ ६ ॥

तव कृपेनें अहा । भुवनमोदा पहा ।
हो उषःकाल हा । दुरिततम निवटुनी ॥ ७ ॥
विविधवर्णहि तुझे । भिन्नमति पुत्र जे ।
ऐक्यकरणीं सजे । त्यांचिया निशिदिनीं ॥ ८ ॥
राष्ट्रहितसाधना । अर्पिणें जीवना ।
उच्च ही भावना । उपजवीं सुतगणीं ॥ ९ ॥
प्रणति तुज भरतभूजननि शुभदायिनी ॥

वन्दे मातरम्.

वंगजागृति

अथवा

जागा झालेला बंगाल.

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

[**स्थळ**—बिडन गार्डनचा रस्ता. कित्येक तरुण बोलत उभे आहेत, असा प्रवेश.]

पहिला तरुण—(चुना गल्लीच्या नामधारी राजाचा अंकित पुरुषोत्तम याला समोरून येतांना पाहून) ओहो! तो पाहिलात का, नामधारी राजेबहाद्दरांचा खुषामत्या पुरुषोत्तम, इकडेच येत आहे तो? येऊंद्या बेट्याला, थोडीशी गम्मततरी करूं. त्या नामधारी राजेबहाद्दरांच्या नादीं लागून स्वारी हल्लीं स्वदेशी चळवळी-विरुद्ध व्याख्यानें देत असते! अवतार तर पहा कसा आहे तो! माकडच जसें! बेटा अगदींच कसा अक्कलशून्य? आणि ते राजेबहाद्दर तर काय विचारूंच नका --शुद्ध नंदीबैल!

दुसरा तरुण—हे नामधारी राजे कोण बुवा?

प० तरुण—तुह्मांला नाहींत का ठाऊक? हो खरें, तुह्मी अद्यापि नवखेच आहां येथें. थोडे दिवस कलकत्त्यांत घालविलेत, कीं सर्व कांहीं कळेल. अहो, हे नामधारी राजेबहाद्दर ह्मणजे पलाशपूरच्या एका बड्या जमीदाराचे चिरंजीव आहेत. बाप मरून सगळी जमीदारी हातीं लागल्या घटकेपासून बेटा राजा होण्याला अगदीं हपापला होता. लोकांनां काय, त्याचे चाळे पाहून लोकहि त्याला तेव्हांपासून नामधारी राजेबहाद्दर ह्मणत असतात.

दु० तरुण—एकूण तो राजा नव्हेच तर?

प० तरुण—खरा राजा नसला, तरी सांप्रत मोठ्या सायासांनीं आणि कष्टानें त्यानें राजा ही पदवी मात्र खरोखरच प्राप्त करून घेतली आहे. आपले देशबांधव बेट्याच्या खिसगणतींतहि नाहींत. गौरकायांची आराधना करण्यांत अष्टौप्रहर चूर.

या स्वारीच्या एक एक माकडचेष्टा पाहिल्या, ह्मणजे हंसूंच येतें. याच्या एकेक कृत्याची आठवण झाली कीं अंगाचा कसा तिळपापड होतो. हा नीच, कुलांगार, आपल्या जमीदारींतील जे कोणी स्वदेशी चळवळींत सामील झाले आहेत, त्यांचा नानाप्रकारें छळ करित असतो.

दु० तरुण—या राजेबहाद्दरांचें नांव काय ह्मणालांत?

प० तरुण—पृथ्वीश्वर चौधरी.

दु० तरुण—नांव तर ऐकलें आहे खरें.

(इतक्यांत पुरुषोत्तम येऊन पोहोंचतो.)

तिसरा तरुण—(पुरुषोत्तमास) नमोनमः! भट्टाचार्य महाशय, नमोनमः! (तिकडे लक्ष्य न देतां पुरुषोत्तम छाती काढून पुढें जाऊं लागतो.) नमस्कार पंडितजी! (पुरुषोत्तम अधिकच वेगानें जाऊं लागतो; तरुणहि झपाट्यानें मागोमाग जाऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवतो.) कां पंडितमहाशय! आज कांहीं ऐकूंच येत नाहीं वाटतें?

पुरुषोत्तम—(रागाचा आविर्भाव आणून आणि तिरस्कारानें तोंड वेडेंविद्रें करून) जाव! (पुन्हा जोरानें चालूं लागतो.)

प० तरुण—(धावत धावत जाऊन पुरुषोत्तमाच्या पुढें उभा राहून) पंडितमहाशय! आपण असे लगबग करून चाललांतरी कुठें? त्या नामधारी राजेबहाद्दरांच्या खुषमस्कऱ्याचें काम करण्याकरितांच कीं नाहीं?

पुरुषोत्तम—चू-प! Shut your lips (तोंड आटोप)!

(पुरुषोत्तम पुनः पुढें जाण्याचा यत्न करतो; परंतु तरुण त्याला तसें करूं देत नाहीं.)

प० तरुण—एवढ्या तांतडीनें आपली स्वारी कोणत्या मोहिमीवर निघाली आहे तें समजल्याशिवाय आह्मी आपल्याला जाऊं देणार नाहीं.

पुरुषोत्तम—You know (समजलेत), पोलिस माझ्या मुठींतलें आहे. (छाती पुढें काढून) I am Police (मी पोलिस आहें)! रास्तेमें गडबड मत करो--चू-प! (पुढें जाऊं लागतो.)

प० तरुण—असे रागावतां कां बरें पंडितमहाशय ? आपलें एक एक मिनिट ह्मणजे लाख रुपये किंमतीचें आहे, ही गोष्ट का आह्मांला ठाऊक नाहीं ?

पुरुषोत्तम—(प्रशंसेनें किंचित् तुष्ट होऊन) All right (बरें आहे), अर्ध्या मिनिटांत काय तें बोला—अर्धें मिनिट तुह्मांला देतों !

प० तरुण—आपले मोठे उपकार आहेत. पण का हो पंडितजी! पुष्कळ लोक ह्मणतात कीं, आपली ' डिग्री ' (पदवी) पोकळ आहे, हें खरें का ?

पुरुषोत्तम—त्या हरामखोरांनां बुटाच्या लाथेखालीं तुडविलें पाहिजे ! (गर्वानें एक पाय जमिनीवर आपटून) I am G. F. (मी **जी. एफ्**. आहें).

प० तरुण—पण हा कोणत्या पदवीचा संक्षेप आहे, तें तर सांगाल ?

पुरुषोत्तम— Government Favour (सरकारी मेहरबानी).

ति० तरुण—अस्सें अस्सें ? आह्मांला आजवर हें माहीतच नव्हतें !

पुरुषोत्तम—तुह्मांला वाटलें असेल कीं, उगाच आपलें कांहींतरी आहे झालें?

प० तरुण—छे छे, भलतेंच एखादें ! पण काय हो पंडितमहाशय, अलीकडे आपण त्या मिशनरी लोकांसाठीं व्याख्यानें देण्याचें कां बरें बंद केलें ?

पुरुषोत्तम—अंः, त्यांच्या नादीं लागण्यांत कांहीं अर्थ नाहीं. जोड्यानें मारले पाहिजेत शिंच्यांनां! बस्स आतां Time is up (उशीर झाला).रास्ता छोडो !

ति० तरुण—आणखी एक गोष्ट विचारतों. आपण ह्मणे हल्लीं त्या चुनागल्लीच्या नामधारी राजेबहाद्दरांच्या खुषमस्कऱ्याची जागा पटकाविली आहे ? त्यांच्यापुढें अगदीं हांजी हांजी करित असतां ? नेहमीं त्यांची अगदीं थुंकी झेलित असतां ?

पुरुषोत्तम—चू-प ! There is one man in Bengal the Raja of Chunagalli (बंगाल्यांत चुनागल्लीचा राजा हाच कायतो एक खरा मनुष्य आहे). बाकी सारे निमकहराम ! हरामखोरांनां चावकाखालीं झोडले पाहिजेत ! बुटांच्या लाथेखालीं तुडविले पाहिजेत ! !

दु० तरुण—अरे हरामखोरा! बुट तुला स्वस्ते झाले आहेत नव्हे ? राजाच्या उष्ट्या पत्रावळी चाटणारा नीच कुठला ! (पुरुषोत्तमाचे हात धरून त्याला धक्का मारूं पहातो, तों त्याच्या बगलेंत असलेलें विलायती कापड दृष्टीस पडतें. तें हिसकावून घेऊन) हें रे काय चोरा ? विलायती कापड ?

पुरुषोत्तम—चू-प ! Lieutenant Governor's Order (लेंफटनेंट गव्हर्नराचा हुकूम).

ति० तरुण—जा हो तुह्मी आपले, पंडितजी ! (पुरुषोत्तमाला धक्के मारतो व कापडाच्या चिंध्या चिंध्या करून फेंकून देतो.)

[पुरुषोत्तम रागानें जातो.

प० तरुण—(खिशांतून दोन रुपये काढून एका सोबत्याचे हातीं देऊन) जा जा, त्याला हे पैसे देऊन ये.(सोबती रुपये घेऊन जातो.) आग लागो याला ! यापुढें विदेशी ह्मणून डोळ्यांपुढें नको ! ! स्वदेशी--स्वदेशी—स्वदेशी ! ! ! (खिशांतून काड्यांची पेटी काढून) ह्मणा, वंदे मातरं ! (कापड जाळून टाकतो.)

सर्व—(मोठ्यानें) वंदे मातरं.

(सनत्कुमार प्रवेश करितो.)

सनत्कुमार—बाबांनों, तुह्मीं हें काय आरंभिलें आहे ? अरे, जेथें आज हजारों स्त्रीपुरुषांनां आपली लज्जा रक्षण करण्यासाठीं फाटक्यातुटक्या चिंध्याहि मिळण्याची मारामार, त्या या आपल्या दारिद्र्यानें गांजलेल्या देशांत, तुह्मीं अशा नव्या वस्त्रांची होळी करावी, हें चांगलें काय ? याला काय ह्मणावें ? हा तुमचा निव्वळ माथेफिरूपणा आहे. आह्मां हिंदु लोकांच्या कोणत्याहि कृतींत अशा अविचाराला थारा कसा मिळावा ?

प० तरुण—महाशय, हें काय होतें तें आपण पाहिलें का ? हें विलायती कापड अंगावर धारण करण्यापेक्षां अंगाला वीष फांसलेलें काय वाईट ? आणि ह्मणून तर आह्मीं याचें जाळून भस्म केलें. आपण स्वदेशी चळवळीचे विरोधी तर नाहीं ?

सनत्कुमार—नाहीं, बाबांनों, मी स्वदेशी चळवळीच्या मुळींच विरुद्ध नाहीं. तथापि तुह्मीं आतां जो हा माथेफिरूपणा केला, तो मला मुळींच पसंत नाहीं ! विलायती वस्त्रें तुह्मी कधींहि वापरूं नका, असें माझें तुह्मांला अगदीं निक्षून सांगणें आहे; परंतु विलायती वस्त्र वापरावयाचें नाहीं, ह्मणजे तें जाळूनच टाकलें पाहिजे, असें मात्र नाहीं. तें जाळून टाकल्यापासून देशाचा कोणता बरें फायदा केल्यासारखें तुह्मांला वाटतें ? भणंगभिकाऱ्यांनां तें देऊन कां टाकित नाहीं ? ज्यांनां लज्जारक्षण करण्यापुर्त्या फाटक्यातुटक्या चिंध्याहि विकत घेण्याचें सामर्थ्य नाहीं,

ते तुमचीं विलायती वस्त्रें विकत घेतील, हें संभवत नाहीं. त्या बापड्यांनां हीं वस्त्रें दिल्यास, कांहीं वावगें होईल काय ? दुर्दैवानें या आमच्या देशांत अशा कंगाल लोकांचा अभाव नाहीं. शिवाय, दुसरीहि एक विचार करण्याजोगी गोष्ट आहे. आतां हें जें वस्त्र तुह्मीं जाळून टाकलें, तें आपल्यापैकींच एकानें पैसे देऊन विकत घेतलें होतें. अर्थात्, नफ्यासह त्याची सर्व किंमत विलायतेंत केव्हांच पोहोंचती झाली आहे. तेव्हां, तें कापड आतां तुह्मीं फाडलेंत किंवा जाळून टाकलेंत, तर त्यांत विलायतवाल्यांचें काय नुकसान झालें ? तुमचे पैसे मात्र तुह्मीं निष्कारण जाळून टाकलेत! आतां तुह्मींच सांगा पाहूं, हा माथेफिरूपणा आहे कीं नाहीं तें ? आहे का यांत आपल्या देशाचा कांहीं फायदा ? असें अविचाराचें कृत्य करून आह्मी हिंदुलोक कधींहि कृतकृत्य होणार नाहीं.

दु० तरुण—आपल्या या एकंदर भाषणावरून,आपला सगळा ओढा विलायतेकडे दिसतो. सध्या सर्वत्र ही जी प्रचंड चळवळ उसळली आहे, एकंदर समाजांत जी विलक्षण जागृति उत्पन्न झाली आहे, तिला आपली तादृश सहानुभूति नाहीं !

सनत्कुमार—सांप्रतच्या या चळवळीला माझी किती आणि कशा प्रकारची सहानुभूति आहे, याची तुह्मांला कल्पनाहि नाहीं ! या माझ्या शरीरांतील प्रत्येक शिरेशिरेमधून, प्रत्येक धमनीधमनीमधून–हें तर काय परंतु प्रत्येक रोमारोमांतून स्वदेशाभिमान उसळत आहे. आणि ह्मणूनच तर, वीस वर्षांच्या माझ्या सुखाच्या नोकरीवर लाथ मारून, या प्रसंगीं मातृभूमीची सेवा करण्याच्या उत्कट इच्छेनें, दूर दिल्लिशहराहून मी येथें आलों आहें. मातृभूमीची सेवा करण्यापलीकडे मला दुसरेंतिसरें कांहींएक दिसेनासें किंवा सुचेनासें झालें आहे, त्या माझी या स्वदेशी चळवळीला सहानुभूति नाहीं, हें संभवनीय तरी आहे काय ?

ति० तरुण—इतक्या वर्षांत आपण यथास्थित द्रव्यसंचय केला असेलच ?

सनत्कुमार—नाहीं बाबांनों, मझ्याजवळ यत्किंचित्हि द्रव्यसंग्रह नाहीं. एवढेंच नव्हे, तर माझ्या पदरीं मुलांबाळांचा परिवार मोठा आहे. मी पलाशपुरचा राहणारा आहें. तेथें माझी दोनचार बिघे जमीन आहे. तिच्यावरच सर्वस्वी भरंवसा ठेवून मीं गुलामगिरीचा त्याग केला आहे.

प० तरुण—असें आहे, तर मग आपण कां उगाच नोकरी सोडली ?

सनत्कुमार— कां, तें काय बाबांनों तुह्मांला सांगितलें पाहिजे ? तुह्मी पहात नाहीं का, कीं परमेश्वरानें सांप्रत आमच्यावर कृपादृष्टि फिरविली आहे. लहानां-

पासून थोरांपर्यंत सर्वांचे डोळे आज उघडले आहेत. चैन आणि ऐषआराम यांसारखा मनुष्याला भुरळ पाडणारा दुसरा शत्रु नाहीं. ज्ञानभ्रष्ट करणाऱ्या त्या चैन आणि ऐषआरामांत गुंग होऊन आह्मी आपलेपणासच मुळीं मुकलों आहों. आपलें असें ह्मणण्याला आमच्याजवळ कांहींएक राहिलें नाहीं. आमचा देह, आमचें मन, दुर्बल झालेलें–संपूर्ण देश विलासरूपी प्रखर अग्नींत दग्ध झालेला; आह्मी सर्व दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणारे-सर्वस्वी दुसऱ्यावर अवलंबून असणारे-लज्जारक्षणार्थ लागणारें वस्त्रदेखील आह्मांला परक्यांजवळून घ्यावें लागत आहे–तेंदेखील आमच्या देशांत होत नाहीं–यापेक्षां अनिष्ट, यापेक्षां शोचनीय, यापेक्षां लज्जास्पद स्थिति ती कोणती? आमच्या दुर्बलतेची–आमच्या पराधीनतेची यापेक्षां आणखी साक्ष काय पाहिजे? अहो, लक्ष्मीचें निवासस्थान अशा या सुवर्णप्रसवा वंगभूमीचीं सुवर्णक्षेत्रें, आज स्मशानवत् झालीं आहेत! रोगांच्या भयंकर सांथींनीं, वारंवार पडणाऱ्या दुष्काळांनीं, द्रव्याच्या पूर्ण अभावानें, खावयास पोटभर अन्न आणि प्यावयास पाणी नसल्यामुळें, धनधान्यांनीं पूर्वी समृद्ध असलेलीं आणि आपल्या मनोहर सृष्टिशोभेनें मन प्रसन्न करणारीं हजारों खेडींपाडीं आज ओसाड पडलीं आहेत! केवढी ही भयानक अधोगति! कोण ही भयंकर स्थिति!! प्रबल ऐहिक सुखाला मोहून गेल्यामुळें आणि प्रदीप्त वासनानलांत दग्ध होऊन गेल्यामुळें आह्मी आज या अधोगतीला आलों आहों; परंतु सुदैवानें प्रत्यक्ष परमेश्वर शववत् झालेल्या आह्मांमध्यें चैतन्य आणण्यासाठीं आज वैद्यरूपानें अवतरला आहे, असें समजा. आणि ह्मणूनच आह्मी सर्व आज असे खडबडून जागे झालों आहों–आमची प्रस्तुत स्थिति समजूं लागलों आहों–आणि ह्मणूनच बाबांनों, आज तुह्मी लक्षावधी वंग-नरनारी, सर्वस्वी निराधार होऊन कंगाल बनलेल्या–दुसऱ्याच्या पायाखालीं चिरडून जात असलेल्या या आपल्या परमपूज्य मातेची सेवा करण्यासाठीं, आत्म-त्यागाचा संकल्प करण्यास प्रवृत्त झालां आहां–आणि ह्मणूनच आज तुमच्या कोटी कोटी कंठांतून निघणाऱ्या सुललित, स्फूर्तिदायक, मधुर मातृनामाच्या गजरानें मृतांच्या शरीरांतहि बलसंचार होत आहे! राष्ट्रीय ऐक्याच्या अशा मंगल प्रसंगीं, परदास्यशृंखलेनें बद्ध होऊन मातृभूमि सोडून दूर रहाणें, कोणाला रुचेल बाबांनों?

दु० तरुण—अहाहा! आपल्या या भाषणानें आमचे कान पवित्र झाले. धन्य आपली देशभक्ति! धन्य आपलें हृदय!! धन्य आपला मोठेपणा!! आपल्याला

आह्मी नम्रपणानें सांगतों कीं, पवित्र कालीघाटावर विश्वजननी कालीमातेसमोर याउप्पर विलायती वस्तु वापरणार नाहीं अशी आह्मींहि प्रतिज्ञा केली आहे.

सनत्कुमार—वाहवा! फार उत्तम! परंतु बाबांनों, विलायती वस्त्र पाहिलें ह्मणजे त्याची अशी होळी करूं, अशीतर कालीमातेसमोर तुह्मीं नाहींना प्रतिज्ञा केली?

सर्व तरुण—नाहीं.

सनत्कुमार—ठीक आहे. तर मग असा अविचार करणें आपणा हिंदु लोकांनां उचित आहे कीं काय, याचा आतां आपण विचार करूं. बाबांनों, आह्मां हिंदूंचा धर्म हाच प्राण असल्यामुळें, आमचे सर्व व्यवहार धर्मसंगतीनेंच होत असतात. आमच्या राजकीय चळवळीहि धर्ममूलकच असावयाच्या. तुह्मांला आठवतच असेल, कांहीं वर्षांपूर्वी संमतीवयाच्या कायद्याबद्दल झालेल्या चळवळीच्यावेळीं, असेच एके दिवशीं कालीघाटावर जाऊन त्या जगन्माता जगदंबेच्या चरणांजवळ आह्मीं आपलें मानसिक दुःख निवेदन केलें, व मनोभावानें तिची करुणा भाकली; अनन्यभावानें त्या दिवशीं आह्मी तिला शरण गेलों. आतां आपला राखीबंधनाचा मंगल दिवस जवळ आला आहे. त्या दिवशींहि गंगेंत स्नान करून आपलें शरीर आणि मन शुचिर्भूत केलें पाहिजे. काय बरें या सगळ्याचा अर्थ? आमच्या एकंदर चळवळींशीं देवतांचा काय संबंध आहे? बाबांनों,आह्मा हिंदुशिवाय यांतील रहस्य कोणास समजावयाचें नाहीं,आणि ह्मणूनच तर इंग्रजांस वाटत आहे कीं, स्वदेशी चळवळ करतां करतां हे हिंदूलोक अखेरीस Religious fanatics (धर्मवेडे) होऊन जातील. आणि त्यामुळेंच दंग्याधोप्याच्या भीतीनें सरकार पोलीसाची एवढी जय्यत तयारी करित आहे; परंतु सरकारचा हा सारा खटाटोप व्यर्थ आहे. या कडेकोट तयारीची मुळींच आवश्यकता नाहीं. सहनशील, शांतताप्रिय, ईश्वरपरायण हिंदु, स्वस्थ मनानें, शांतवृत्तीनें, हृदयांत परमेश्वरावर दृढभाव ठेवून कोणतीहि चळवळ करितील, आणि ह्मणूनच सर्व राष्ट्रभर पसरलेल्या या प्रचंड चळवळींत आह्मी हिंदुलोक आपली नेहमींची धार्मिकवृत्ति सोडून तंटेबखेडे किंवा मारामाऱ्या करूं, हें संभवनीय नाहीं. आजवर असें कधीं झालें नाहीं, आणि पुढेंहि होण्याचा संभव नाहीं. या संपूर्ण जगांत, एक हिंदूखेरीज अशा शांतवृत्तीनें,अशी एखादी चळवळ करण्यास इतर कोणीहि समर्थ नाहीं. आणि तेवढ्यासाठींच तर मी ह्मणत आहें कीं, पूर्ण हिंदूपद्धतीनें काम करावयाचें, ह्मणजे

त्यांत विलायती वस्तूंची जाळपोळ करणें किंवा इतर कसलाहि दांडगेपणा करणें, अनुचित आहे.

प० तरुण—आपली आज्ञा शिरसावंद्य आहे. आपण परमज्ञानी, पराकाष्ठेचे स्वदेशाभिमानी आहां. आपल्या उपदेशानुसार वर्तन ठेवल्यास आमच्या हातून खरें खरें देशकल्याण झाल्याविना रहाणार नाहीं. या घटकेपासून आपण आमचे गुरु आहां; आह्मी सर्व आपले शिष्य आहों. वेळोवेळीं योग्य उपदेश करून आपण देशहिताचे कामीं आह्मांला स्फूर्ति द्यावी, अशी आमची विनंति आहे.

सनत्कुमार—गुरु होण्याजोगें कांहीं माझ्या अंगीं ज्ञान नाहीं. तथापि माझ्याशीं संभाषण करण्यांत जर तुह्मांला खरोखरच समाधान वाटत असेल, तर वाटेल तेव्हां तुह्मी माझ्याकडे खुशाल येत जा. मला जें योग्य दिसेल तें मी मोकळ्या मनानें तुह्मांला सांगत जाईन. तूर्त कांहीं दिवस मी कलकत्त्यांतच रहाणार आहें. कारण,घरीं माझी आणि माझ्या भावाची,अशा दोन मुली लग्नाच्या झाल्या आहेत, त्यांनां योग्य स्थळें शोधून काढिलीं पाहिजेत.

दु० तरुण—आपण ब्राह्मण काय ?

सनत्कुमार—नाहीं, मी कायस्थ आहें.

ति० तरुण—आपल्या तोंडून जी आपली सांपत्तिक स्थिति ऐकिली, तीवरून हल्लींच्या दिवसांत कन्यादान करणें आपल्याला फार जड जाईलसें वाटतें.

सनत्कुमार—बाबांनों, आतां आमची सारी आशा, आमचा सारा भरंवसा, तुमच्यावर आहे. आज मी एक दरिद्री मुलीचा बाप असल्यामुळें तुह्मी जर मँचेस्टरच्या कापडाप्रमाणेंच मलाहि बहिष्कार घालूं लागलां, तर मग या एकंदर चळवळीचा उपयोग काय ? इतके दिवस आपण धर्मभ्रष्ट, बुद्धिभ्रष्ट झालों असल्यामुळें अहिंदुप्रमाणें आचरण करित होतों. आतां पुढेंहि तसेंच करावयाचें कीं काय ? आतां हिंदूला जर हिंदु ओळखणार नाहीं, तर दुसरा कोण ओळखणार? आज मी दरिद्री ह्मणून माझ्या मुलीचा विवाह होत नाहीं, तर मीं काय जातिभ्रष्ट व्हावें ? पूर्वी मुलीला साडीचोळी नेसवून नुस्ती पिवळी करून कन्यादान होत असे, तसे दिवस आतां पुन्हा यायचेच नाहींत काय ? सध्याच्या या राष्ट्रीयजागृतीचा उद्देश फक्त विलायती कापडाचा त्याग करण्याचाच आहे, कीं हिंदूंनीं हिंदूंची लाज राखावी, हिंदूंनीं हिंदूंनां ओळखावें असा आहे ? तुह्मांलाच मी एक गोष्ट

विचारतों, तुह्मां तरुणांपैकीं जे अविवाहित आहेत, त्या सर्वांनीं हल्लीं चालू असलेल्या पद्धतीप्रमाणेंच लग्न करण्याची प्रतिज्ञा केली आहे का ?

कित्येक तरुण—(एकदम) मुळींच नाहीं. आह्मांला या नवीन पद्धतीशीं कांहींएक कर्तव्य नाहीं, आणि आह्मी तशी कांहीं प्रतिज्ञाहि करणार नाहीं.

सनत्कुमार—मग बाबांनों, मला कसली काळजी आली आहे ? माझीच गोष्ट कशाला ? कोणाहि कंगाल मनुष्याला मग काळजी करावयाला नको. ही प्रचंड चळवळ जर का आह्मांला आमच्या जुन्या योग्य चालीरीतींकडे वळवील, तर आमची पुनः उन्नति होण्याला मुळींच विलंब लागणार नाहीं. या वंगदेशांतील चैन-भोग-विलास इत्यादि भयंकर वणव्यांत सांपडून दग्ध होत असलेलीं अनेक गृहें मग शांतिसुखाचा अनुभव घेऊं लागतील; ऐषआरामांत गुंग होऊन गेलेल्या, आणि खोट्या भपक्याला भुलून जाऊन संसाराचा विध्वंस करणाऱ्या असंख्यवंगनारी शुद्धीवर येऊन संसाररक्षण करूं लागतील. अन्नपूर्णेच्या या देशांत मग घरोघर अन्नपूर्णा विराजमान होतील. भाजीभाकर खाऊन आह्मी तृप्त होऊं. अंगाला हळद लावून पिंवळ्या केलेल्या दुःखी दरिद्री आईबापांच्यामुलींचीं लग्नें होण्यास आयास पडणार नाहींत. आणि पैशासाठीं आह्मांला दुसऱ्याचें दास्य करावें लागणार नाहीं.

प० तरुण—हिंदुत्वाचें रक्षण करण्यासाठीं आह्मी सर्वस्वाचा त्याग करण्यास सिद्ध आहों.

सनत्कुमार—बाबांनों, ईश्वर तुमचें कल्याण करो ! तुमच्या मनाची हीच वृत्ति सदैव कायम ठेवो. आपली ही प्रस्तुतची चळवळ सरकाराच्या विरुद्ध नाहीं, किंवा वंगभंगासंबंधीं चालविलेलीहि नाहीं, हें पक्कें लक्ष्यांत ठेवा. ही आमची सामाजिक चळवळ आहे. आमचें हिंदुत्व अबाधित राखण्यासाठीं ही चळवळ आहे. हिंदुधर्माची पुनश्च प्राणप्रतिष्ठा करतांना भोगविलासादि ऐहिकसुखांचा त्याग करून आमचें मानसिक आणि आध्यात्मिक स्वातंत्र्य पुनः प्रस्थापित करण्यास या वेळीं प्रत्येकानें झटलें पाहिजे.

सर्व तरुण—ईश्वराला स्मरून सांगतों कीं, आह्मी असेंच करूं.

सनत्कुमार—अशी दृढ श्रद्धा ठेवाल तर तो कृपाळु परमेश्वर तुमचे इष्ट हेतु पूर्ण करीलच करील. चला, आतां आपण सर्व बरोबरच जाऊं.

[जातात.

प्रवेश २ रा.

[स्थळ—पलाशपुर येथील शाळागृह.]

मास्तर—(स्वगत) गिन्डार गार्टिन पद्धति–किन्डार गार्टन पद्धति ! जीते रहो–बेटा जीते रहो! मॅकमिलन कंपनीच्या पुस्तकाचें हें भाषांतर ज्यानें केलें, त्या साधुपुरुषाचें देव कोटकल्याण करो ! त्यानें जर हें असें सुंदर भाषांतर केलें नसतें, तर ही पद्धत शाळांतून सुरू कशी झाली असती ?–पण काय बरें नांव तें? इतके दिवस मी कसें घोंकून घोंकून पाठ करतों आहे, तरी बेटें मधून मधून ध्यानांतून निसटतेंच आहे?—हं हं, आतां बरोबर. तीन गज टिन् टिन् !—छे छे, चुकलें. बरें आतां पुनः पाहूं—किंगार टिन् टिन्—अं हं, मध्यें एक बेटा 'ड' आहे कुठेंतरी—किन दोर टिन् टिन् ! हें शिंचें टिन् टिन् बरोबर जुळतें आहे, परंतु मधला एक 'ग' कुठें आहे तें आठवत नाहीं. दम धर बेट्या ! तुझी अशी चुकवाचुकव चालायची नाहीं. हा पहा तुलाहि आतां पकडला !—किन्दोर घर टिन् टिन् ! पण इतका उपद्व्याप करण्यापेक्षां हें लिहिलेलें आणखी एकवार पाहिलें तर काय वाईट ? हें पहा या पुस्तकाच्या डोक्यावरच लिहिलेलें आहे. (वाचतो) अरे बेट्या ! किन्डर गार्टन नव्हे का तुझें नांव ? आतां का मी विसरणार आहें ? या पद्धतीनें पोरांचा काय फायदा होईल तो होओ, पण सध्या आमच्या फायद्यावर तरी ही पद्धत आली आहे खरी! घरांत मलेरियानें धरलें आहे अंथरूण. तेव्हां झाडसारवण, शेणपोतेरें हीं सर्व कामें आतां करावीं कोणीं ? तो गाईचा गोठा झाडून साफ करावा कोणीं ? आणि गाईला चारायला तरी न्यावी कोणीं ? शिवाय, चुलीशीं बसून डोळे फोडून घेतले पाहिजेत, तें निराळेंच. बस्स तें कांहीं नाहीं. या किन्डर गार्टन पद्धतीनेंच यापुढें हीं आमचीं सर्व कामें करून घेतलीं पाहिजेत. त्याचप्रमाणें हें स्वयंपाकशास्त्रासंबंधीं पुस्तक नव्हे का ? हेंहि सुरू करून मुलांकडून स्वयंपाकहि करून घेतला पाहिजे. पंडित विद्यासागर तर मरून गेला आणि हे दुसरे पंडितहि त्याच मार्गानें जाओत पाहिजे तर ! बेट्यांनीं काढलेलीं पुस्तकें काय पण ? पोरांनां घोकंपट्टी करतां करतां नकोनकोसें होतें नाहीं. तर हें पहा—अरे, पण हीं मुलें येऊं लागलीं. एकंदर गृहकृत्यें आतां यांच्याकडून पहा तर कशीं करून घेतों तीं ! (मुलें मास्तरसाहेबांस प्रणाम करून आपापल्या जाग्यावर बसतात.)

मास्तर—रहीम ?

(रहीम उभा राहतो.)

मास्तर—काल तुह्मांला गाईची माहिती सांगितली होती. गाईला पाय किती असतात, सांग पाहूं ?

रहीम—(उभा राहून) चार मास्तर.

मास्तर—शाबास! तुझी स्मरणशक्ति खरोखरच चांगली आहे! बरें, शिंगें किती असतात ?

रहीम—दोन मास्तर.

मास्तर—बरोबर. तूं हुषार मुलगा आहेस! आतां गाईला शेंपट्या किती असतात, सांग पाहूं ?

रहीम—एक मास्तर.

मास्तर—वाहवा! वाहवा! तूं आपले धडे उत्तम तयार करतोस. बरें-

सतीश—(मध्येंच) मास्तर, या गोष्टीतर सगळ्यांनां माहीत आहेत. यासाठीं पुस्तकांतील धडेच कशाला पाठ केले पाहिजेत ?

मास्तर—(रागानें हातांत छडी घेऊन त्याच्याजवळ जाऊन) फाजील, बेशरम कुठला! तुला कोणीं मध्यें बोलायला सांगितलें ? मी सांगतों तुला धडे कशाला पाठ करायचे ते! (छडीनें सतीशला यथास्थित चोपून पुन: रहीमकडे वळून) रहीम, गाईचे खूर कसे असतात ?

रहीम—विभक्त असतात मास्तर.

मास्तर—शाबास! शाबास! रहीम, आज मी तुझ्यावर अगदीं खुष होऊन गेलों आहें. तुझ्यासारखा विद्यार्थी मिळाल्यावर त्याला अधिकाधिक शिकविण्याला कोणाला हुरूप येणार नाहीं ? आतां असें कर, आमच्या गोठ्यांत जा. तेथें आमची गाई बांधलेली आहे. तिला नीट बारकाईनें पाहून गाईसंबंधीं एकंदर माहिती तूं प्रत्यक्ष करून घे. तिला गोठ्यांतून सोडून कुरणांत घेऊन जा, आणि अगदीं दृष्टीसमोर राहूं दे. ह्मणजे ती चालते कशी, धावते कशी, चारा कशी खाते, नंतर रवंथ कशी करते, पाणी कशी पिते, याचें तुला प्रत्यक्ष ज्ञान होईल. लवकर जा पाहूं कसा ?

[रहीम जातो.

एक विद्यार्थी—मास्तर, पुस्तकांत गाईचे खुर विभक्त असतात असें लिहिलें आहे. विभक्त ह्मणजे काय हो ?

मास्तर—(धमकावून) हॅं, विभक्त ह्मणजे काय तुला माहीत नाहीं मूर्खा ? विभक्त ह्मणजे—अं–अं–हं–पण तुला तें समजणार नाहीं. सतीशचंद्र सरकार, गाईच्या विष्ठेला काय ह्मणतात ?

सतीश--मास्तर शेण.

मास्तर—ठीक, शेणाचा उपयोग काय होतो ?

एक विद्यार्थी--खत होतें मास्तर, फुलझाडांनां घालायला.

(मास्तरसाहेब त्याचा कान पिरगळतात. थोडा वेळ रडून बिचारा स्वस्थ बसतो.)

सतीश--सडापोतेरें घालतात.

मास्तर--आणखी काय करतात ?

सतीश--जमीन सारवतात.

मास्तर—शाबास ! तूं फार हुषार मुलगा आहेस. तूं मोठा विद्वान् होणार, यांत शंका नाहीं. परंतु हें पहा, ही पोपटपंची कांहीं कामाची नाहीं. प्रत्येक गोष्टींचें प्रत्यक्ष ज्ञान असलें पाहिजे. आतां तूं असें कर. आमच्या गोठ्यांत जाऊन प्रथम तेथलें सगळें शेण गोळा कर. नंतर तें परसांत घेऊन जाऊन त्याच्या तूं आपल्या हातानें शेणी घालण्याचा अभ्यास कर.नंतर गाईचा गोठा काळजीपूर्वक झाडून स्वच्छ कर. घाण बिलकूल रहातां कामा नये. स्वता हातानें कोणतीहि गोष्ट केल्याविना त्या गोष्टीचें यथार्थ ज्ञान होणें शक्य नाहीं. नुस्तीं पुस्तकें वाचित बसल्यानें किंवा घोकंपट्टी केल्यानें कांहींएक होणें नाहीं. जा.

[सतीश जातो.

मास्तर--यदुनाथ दास ?

यदुनाथ--हजीर मास्तर.

मास्तर--घर सारवतात कसें ?

यदुनाथ--हातानें किंवा केरसुणी घेऊन.

मास्तर--अरे वा! तूं मोठा चौकस मुलगा आहेस. संसाराचें बरेंच ज्ञान तूं प्राप्त करून घेतलें आहेस. बरें पण कायरे, सारवतात कसें हें तूं कधीं पाहिलें आहेस का? त्याचप्रमाणें स्वतां कधीं सारवलें आहेस का?

यदुनाथ—हो पाहिलें आहे पुष्कळ वेळां; पण हातानें नाहीं कधीं सारवलें.

मास्तर—अरेरे! मग काय? मग तूं अद्यापि कच्चा आहेस! प्रत्यक्षज्ञानाची तुझ्यांत उणीव आहे. तर मग आतां असें कर. आमच्या स्वयंपाकघरांत जा, आणि तेथून केरसुणी घेऊन सारें घर प्रथम चांगलें झाडून काढ आणि मग चांगलें ताजें शेण घेऊन साऱ्या घराला आपल्या हातानें सारवण घालून पहा पाहूं!

[यदुनाथ जातो.

मास्तर—दुसऱ्या यत्तेंतील मुलें आलीं का सगळीं?

तीनचार मुलें—(एकदम) होय मास्तर, सगळीं आलीं.

मास्तर--गिरीश, सांग पाहूं, झाडाचे मुख्य भाग किती?

गिरीश—दोन.

मास्तर-- कोणकोणते?

गिरीश--खोड आणि मुळें.

मास्तर--मुळांचा झाडाला काय उपयोग?

गिरीश—मुळें जमिनींतून रस शोषून घेऊन झाडाचें पोषण करितात.

मास्तर—शाबास! वनस्पतीशास्त्राची तुला बरीच माहिती आहे. आतां सांग पाहूं, पानांचा काय उपयोग?

गिरीश—केळीच्या पानांवर जेवतात, ताडाच्या पानांवर लिहितात, टेंबूर्णीच्या पानांच्या विड्या करतात—

मास्तर—(गिरीशच्या पाठीवर दोन छड्या ओढून) अरे गाढवा! तें तुला कोणीं विचारलें? पानांचा झाडाला काय उपयोग होतो, तें सांग?

गिरीश—पानें वृष्टीपासून झाडाचें रक्षण करतात.

मास्तर--(गिरीशच्या पाठीवर आणखी दोन छड्या ओढून) मूर्ख कुठला! पानें हवेंतील ग्यास ओढून घेतात आणि तो ग्यास हेंच झाडाचें अन्न होय?

गिरीश—पण मास्तर, ग्यास ह्मणजे काय?

मास्तर—(डोकें खाजवित खाजवित) ग्यास—ग्यास—ग्यास ह्मणजे काय तुला अजून माहीत नाहीं ? दगड कुठला ! अरे दगडी कोळसे जळूं लागले ह्मणजे त्यांतून निघतो तो ग्यास ! मी राणीगंज येथें हें डोळ्यांनीं पाहून आलों आहें.

गिरीश—पण इथें कुठें आहेत दगडी कोळसे ?

मास्तर—हा मूर्खा ! दगडी कोळसे सगळीकडे आहेत. बैला, जर दगडी-कोळसे नसते, तर या झाडांनां ग्यासरे कसा मिळता ? बरें, तें असो. (विनोदकडे वळून) विनोद, हीं जीं समोर झाडें दिसतात, त्यांच्या मुळाशीं जाळ्या वाढूं दिल्या तर काय होईल ?

विनोद—रान होईल, आणि मग त्यांत पांखरें घरटीं करतील.

मास्तर—उनाड कुठला ? पांखरांच्या घरट्यांशिवाय तुला कांहीं दिसतच नाहीं. (विनोदच्या पाठीवर एक छडी ओढून) अरे, अशा जाळ्या वाढूं दिल्या तर झाडें बरोबर वाढत नाहींत. एवढ्यासाठीं या जाळ्या काढून टाकल्या पाहिजेत, समजलास ?

विनोद—होय मास्तर, आतां समजलें.

मास्तर—नुस्तें तोंडानें समजलें ह्मटल्यानें मी नाहीं कबूल करणार तुला समजलें असें ? मला तुझी परीक्षा पाहिली पाहिजे. आमच्या घरांतून एक खोरें घेऊन तूं आमच्या परसांत जा, आणि तेथें झाडेंझुडपें, जाळ्या वगैरे असतील त्या सगळ्या उपटून काढ पाहूं. आणि हें पहा विनोद, तो सगळा कचरा नंतर बाहेर फेंकून दे हो ? जा, लवकर आटोप कसा ! मी येतों पहायला तुला काय समजलें आहे तें.

[विनोद जातो.

(शाळेच्या डेप्युटी इन्स्पेक्टरांनां बरोबर घेऊन प्रेमानंद बाबु
आणि रहीमचा बाप केफातुल्ला प्रवेश करितात.
त्यांनां पाहून मास्तरांची गडबड उडते.)

केफातुल्ला--(डेप्युटीस) पहा रावसाहेब, मी सांगत होतों तें खरें कीं खोटें तें आपल्या डोळ्यांनीं पहा. चांगल्या घरंदाज लोकांच्या मुलांकडून हे मास्तर आपल्या घरांतील मोलमजुरीचीं कामें करून घेत असतात. असल्या लहानलहान मुलांचीं का हीं कामें आहेत ?

डेप्युटी—छे, भलतेंच एखादें ! (मास्तरांकडे वळून) मास्तर, मुलें कुठें गेलीं सगळीं ?

केफातुल्ला--(मास्तरांस) मास्तरसाहेब, माझ्या मुलाला तुह्मीं कुठें पाठविलें?

एक विद्यार्थी—रहीम, मास्तरसाहेबांची गाई चारायला गेला आहे कुरणांत!

मास्तर— छे छे ! त्याला गाईसंबंधीं एकंदर माहिती प्रत्यक्ष व्हावी यासाठीं पाठविला आहे.

केफातुल्ला—मास्तरसाहेब, आह्मी अडाणी खेडवळ लोक; आह्मांला तुमच्या बोलण्यांतले हे पाचपेंच कांहीं समजत नाहींत. तुह्मी त्याला गुरें राखायला पाठवूं लागलां, तर आमचीं घरचीं गुरें त्यानें राखलेलीं काय वाईट ? गुरें राखायला त्याला शाळेंतच कशाला पाठविला पाहिजे ?

(इतक्यांत रहीम प्रवेश करितो. त्याला पहातांच मास्तर कावरेबावरे होतात.)

रहीम--मास्तरसाहेब, आपली गाई उद्धवघोषाच्या परसांत शिरून तेथील झाडापानांचा विध्वंस करित आहे. मीं तिला फिरवायचा फार यत्न केला, पण ती कांहींकेल्या मला वळत नाहीं. मारायला धावते. चला लौकर.

मास्तर--आँ-आँ-क-क-काय म-ह्मणतोस-रहीम ? उद्धवघोषा—-

केफातुल्ला—(मास्तरांच्या बोलण्याकडे लक्ष्य न देतां रहीमचा हात धरून) चलरे बाबा, नांगर धरून पोट भरूं. हें असलें शिकणें आपल्याला नको.

[रहीमला घेऊन जातो.

(शेणानें हातपाय लडबडलेला सतीश, हातांत केरसुणी घेतलेला यदुनाथ, आणि सर्व अंग मातीनें माखलेला विनोद, प्रवेश करितात.)

सतीश—मास्तर, मोठ्यांतलें सगळें शेण भरून परसांत नेलें आणि त्याच्या शेणी घालून टाकल्या. आतां गोठा तेवढा साफ करायचा राहिला आहे. बालदी आणि झाडू कुठें आहे ?

यदुनाथ—स्वयंपाकघर, माजघर वगैरे सर्व झाडूनसारवून चक्क केलें. आतां तेवढी कोठीची खोली राहिली आहे. तिची किल्ली द्या.

विनोद—परसांतलें गवत, झाडेंझुडपें पार सारीं उपटून काढलीं. मास्तर, एक पावडें द्या, ह्मणजे सगळा कचरा गोळा करून बाहेर टाकतों.

डेप्युटी—(गांगरून जाऊन स्तब्ध उभे राहिलेल्या मास्तरसाहेबांस गंभीर मुद्रेनें आणि विरक्त स्वरानें) तुह्मीं हें सगळें काय मांडलें आहे ?

मास्तर—(दोन्ही हात जोडून) हुजूर, मी करतों आहें तें अगदीं बरोबर आहे. आपल्या हुकुमाबाहेर मी लवभरहि वागत नाहीं. पुस्तकीविद्येनें मुलांनां विषयाचें ज्ञान बरोबर होत नसल्यामुळें सरकारच्या हुकमाप्रमाणेंच मुलांनां मी हें वस्तुपाठाचें प्रत्यक्ष ज्ञान देत आहें. यांत माझी चूक असेल तर दाखवा ?

प्रेमानंद—(संतापानें) गांवांतील सर्व मुलांनीं तुमच्या घरीं मजुरासारखें राबावें, असा सरकारानें कायदा केला आहे वाटतें ?

मास्तर—महाशय, असे रागावूं नका. शिक्षणक्रमाच्या बाबतींत सरकारानें हल्लीं केलेल्या सुधारणा आपल्याला माहीत नाहींसें दिसतें. जेणेंकरून मुलांनां सर्व वस्तूंच्या गुणधर्मांचें यथार्थ आणि प्रत्यक्ष ज्ञान होईल, असें शिक्षण हल्लीं द्यावें लागतें. कोणतीहि वस्तु त्यांनीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहून तिचे गुणधर्म प्रत्यक्ष समजून घ्यावे व हातांनीं ती तयार करून पहावी, असा सरकारचा हुकूम असल्यामुळें मीहि मुलांनां तसेंच शिक्षण देत आहें. आतां यांत एक मात्र माझी चूक आहे कीं, या नवीन तऱ्हेच्या शिक्षणक्रमासाठीं लागणाऱ्या सर्व वस्तू मी आपल्या स्वताच्या देत असतों. त्यासाठीं सरकारी पैसा पाहिजे तसा खपवित नाहीं. (डेप्युटीकडे पाहून) हुजूरांनां हें समजलें ह्मणजे ते सरकारांत याबद्दल माझी तारीफच करतील.

प्रेमानंद—(डेप्युटीस) काय रावसाहेब, सरकारानें खरोखरच का अशी नवीन व्यवस्था केली आहे ?

डेप्युटी—होय. आधुनिक शिक्षणपद्धति अशीच आहे खरी. या पद्धतीचीं मूलतत्त्वें या मास्तरांच्या मनावर चांगल्याप्रकारें बिंबलीं आहेत, यांत शंका नाहीं; परंतु ती व्यवहारांत आणण्याचा यांचा मार्ग लोकांत किंचित् गैरसमज उत्पन्न करण्यासारखा आहे, असें ह्मटलें पाहिजे. (मास्तरांकडे वळून) याउप्पर मुलांनां असलीं कामें सांगत जाऊं नका, समजलां ?

प्रेमानंद—(विरक्तपणें) आग लागो त्या तुमच्या मूलतत्त्वांनां आणि तुमच्या त्या आधुनिक शिक्षणपद्धतीला! आम्हांला त्याची जरूर नाहीं!

डेप्युटी—असा निष्कारण कां बरें गैरसमज करून घेतां? Kinder Garten System (किंडरगार्टन पद्धति) शिक्षणक्रमांत मोठें स्थित्यंतर करून सोडील.

प्रेमानंद—होय, त्यांत मुळींच शंका नाहीं! परंतु तें स्थित्यंतर असें होईल कीं, सरकारी शाळांत व कॉलेजांत शिकावयाला कोणीहि आपलीं मुलें पाठविणार नाहीं!

डेप्युटी—हें पहा, हा तुमचा गैरसमज मी आत्तांच दूर करतों. या नवीन पद्धतीनें मुलांची धारणाशक्ति आणि ज्ञान यांचा केवढा विकास होतो, याचा आतांचे आत्तांच मी तुम्हांला प्रत्यय आणून देतों. (एका विद्यार्थ्यास) मुला, तुझ्या हातांतील तें पुस्तक उघडून वाच पाहूं.

विद्यार्थी—(पुस्तक उघडून वाचतो) गाईचा मुख्य आहार गवत होय. गाई कुरणांत चरते. जीभ, दांत आणि तोंडाचा जबडा ह्यांच्या साह्यानें गाई गवत तोडून तोंडांत घेते व त्याचें चर्वण केल्याशिवायच तें गिळून टाकते. गाईच्या उदरामध्यें चार पिशव्या असतात.

डेप्युटी—आतां पुस्तक मिटून सांग पाहूं, गाईच्या उदरामध्यें या ज्या चार पिशव्या असतात, त्यांमध्यें कसकशी क्रिया घडत असते?

विद्यार्थी—(पुस्तक बंद करून) पहिल्यानें गाय चरतेवेळीं जितकें गवत पाहिजे तितकें घेऊन तें ती पहिल्या पिशवींतून दुसऱ्या पिशवींत पाठविते. ही दुसरी पिशवी भरतांच ती चरण्याचें बंद करते. नंतर इच्छेस येईल तेव्हां दुसऱ्या पिशवींतून गवत बाहेर घेऊन ती स्वस्थपणें चघळित बसते, आणि चघळल्यावर तें पुनः गिळते; परंतु तें चघळून गिळलेलें गवत नंतर दुसऱ्या पिशवींत न जातां तिसरींतून चौथींत पोंचतें. याला रवंथ करणें असें ह्मणतात.

डेप्युटी—(दुसऱ्या एका विद्यार्थ्यास) बरें तूं सांग पाहूं, गुरांनां अशा प्रकारें रवंथ करतां यावें, अशी व्यवस्था कां बरें करावी लागली असावी?

दुसरा विद्यार्थी—रानांमध्यें गाईंनां सिंहव्याघ्रादि हिंस्रपशूंची भीति फार असते. ह्मणून जेवढें गवत मिळवितां येईल तेवढें तांतडीनें एकदा पोटाच्या पिशवींत भरून घ्यावें व भीति दिसतांच पळून जाऊन नंतर निर्भय स्थळीं बसून स्वस्थपणें रवंथ करून खावें, अशी ईश्वरानें गाईच्या पोटाची योजना केली आहे.

डेप्युटी—बरोबर उत्तर दिलेंस. बैस. (एका आठ वर्षांच्या मुलाला उद्देशून) कायरे मुला, तूं काय शिकत असतोस ?

तिसरा विद्यार्थी—मी पांचवें पुस्तक, भुगोल, खगोल, इतिहास, व्यवहारीक भूमिति युक्लीडचे सिद्धांत, सानीटरी प्रायमर, बीजगणीत, ड्रॉईंग, इन्फंटरीडर—

प्रेमानंद—(डेप्युटीस) रावसाहेब, माझी आपल्याला एक थोडी विनंति आहे; आपल्या या नवीन शिक्षणपद्धतीचा उद्देश काय आहे हें कांहीं माझ्या डोक्यांत बरोबरसें शिरलें नाहीं. तथापि आपण पोपटपंची विद्येच्या अगदीं विरुद्ध आहां, असें मीं अनुमान केलें आहे. मला वाटतें, ही पोपटपंची विद्या जर मनुष्या-सारखी प्रत्यक्ष असती, तर सरकारानें तिला केव्हांच काळ्या पाण्यावर पाठविलें असतें !

डेप्युटी—(किंचित् स्मित करून) यांत काय संशय !

प्रेमानंद—पण आतां तुह्मीं या विद्यार्थ्यांकडून जें कांहीं वदविलें, तें मुलांनीं अथपासून इतिपर्यंत पोपटासारखें पाठ ह्मणून दाखविलें. त्यांतील एक अक्षरहि त्या बिचाऱ्यांस कळलें असेल तर देवाला ठाऊक !

डेप्युटी—आपण असें कां बरें ह्मणतां ? त्यांनां तें समजलें असलें पाहिजे.

प्रेमानंद—ह्या सर्व गोष्टी तुह्माआह्मांला कळणेंहि कठीण—त्या या बिचाऱ्या अर्भकांस कशा कळतील ? मघांपासून मी मुलांच्या चेहऱ्याकडे लक्ष्यपूर्वक पहात आहें, आपण जें कांहीं सांगतों आहों त्यांतील एक अक्षरहि समजल्याचें एकाच्याहि मुद्रेवरून दिसलें नाहीं. अथपासून इतिपर्यंत पाठ केलेलें भाषण ह्मणत होतीं. बेअदबीची माफी असावी रावसाहेब, पण मी तर स्पष्ट ह्मणतों कीं, अशाच प्रकारें तुह्मीं जर आमच्या मुलांनां शिक्षण देण्याचें आरंभिलें, तर कांहीं वर्षांनीं त्यांनां मनुष्यजातींतून पशुजातीमध्यें नेऊन बसवाल !

डेप्युटी—बाबुमहाशय, आपण ह्मणतां तें सर्व खरें आहे; परंतु आह्मांला नोकरी करावयाची आहे, आणि नोकरी करतांना वाईटालाहि चांगलें ह्मणावें लागतें. अधिक काय सांगूं, एकदा गुलामगिरी पत्करली ह्मणजे सदसद्विवेकबुद्धीला पार धुडकावून लाविलेंच पाहिजे. चला आपण बरोबरच जाऊं (मुलांनां) तुह्मी आतां घरीं जा, तुह्मांला आज सुटी आहे.

[सर्व जातात.

प्रवेश ३ रा.

[**स्थळ**—राजेबहाद्दरांच्या बगीचांतील वाड्याचा दिवाणखाना.
राजेबहाद्दर, पुरुषोत्तम, दिवाण वगैरे मंडळी
बोलत बसली आहे, असा प्रवेश.]

राजा--अँ-अँ-आँव-पुरुषोत्तम, किती वाजले रे ?

पुरुषोत्तम--(गडबडून) सरकार, आठांचा सुमार झाला असावा.

राजा—घड्याळांत पहा बरें—अँ-अँ-आँव.

पुरुषोत्तम—(तांतडीनें उठून) जी सरकार ! (जातांना) घड्याळ न पाहतां महाराजांस खोटेंच सांगितलें—याचें हें प्रायश्चित! (दोन्ही गालांवर जोरानें दोन चापट्या मारून घेतो. घड्याळांत पाहून परत येऊन) सरकार, सात वाजून पंचवीस मिनिटें झालीं आहेत. इकडे येईपर्यंत जीं कांहीं सेकंडें वर झालीं असतील, तीं मात्र धरलीं नाहींत. बाकी अगदीं accurate (बरोबर) टाईम आहे.

राजा--दिवाणजी, guest (पाहुणे) येतांच उभें राहून कुर्निश करून good evening (गुड इव्हिनिंग) करायला विसरूं नका बरें ? etiquette (शिष्टाचारपद्धति) प्रमाणें वागलें पाहिजे. काय समजलेत—अँ-अँ-आँव ?

दिवाण--जी सरकार. आपल्या कानांवर आतां एक गोष्ट घालायची आहे. एक फकीर स्वदेशी चळवळींत सामील होण्याविषयीं आपल्या जमीदारींतील लोकांस उत्तेजन देत आहे. बरेच लोक त्याच्या नादीं लागले असून रात्रंदिवस त्याच्याबरोबर फिरतात व रस्त्यांत 'वंदे मातरम्' चा मोठमोठ्यानें घोष करितात. फकीर जें कांहीं सांगतो, तें ही सर्व मंडळी कळसुत्री बाहुल्याप्रमाणें करित असते. जास्त काय सांगावें सरकार, आपले अनेक नोकरचाकर, कारकून, कारभारी, नोकरी सोडून गेले आहेत. महाराजांनीं याचा लवकर बंदोबस्त केला पाहिजे. लोकांची कांहींतरी समजूत घातली पाहिजे.

राजा—अँ-अँ-आँव-मी कोण आहें तें या कुत्र्यांनां ठाऊक नाहीं वाटतें ? पोलिस तर माझ्या अगदीं मुठींतलें आहे. साऱ्यांनां पोलिसाच्या हवालीं करीन. सगळ्यांच्या पाठीवर फटके ओढीन. अँ-अँ-नोकर लोक नोकरी सोडून गेले काय? नोकरी सोडून आतां काय खातील? कुत्र्यासारखे सारे पुनः लाळ घोटित येतील,

पण एकाहि हरामखोराला पुनः कामावर ठेवणार नाहीं! दिवाणजी, नवीन लोक आणून सगळ्या जागा भरून टाका—अँ-अँ-आँव.

दिवाण—सरकार! ज्यांनीं नोकरी सोडली आहे, ते पुनः नोकरीची अपेक्षा करित नाहींत. अनेक श्रीमान् लोकांनीं गांवोगांव असंख्य हातमाग काढले आहेत, कापसाची लागवड जारीनें चालविली आहे, त्या कामीं बऱ्याच लोकांची आवश्यकता असल्यामुळें आपले नोकरचाकर त्यांनां जाऊन मिळाले आहेत. नवीन लोकहि कोणी येण्यास इच्छित नाहींत.

राजा—कुच परवा नहीं! गोऱ्या लोकांनां नेमा—अँ-अँ-आँव.

दिवाण—पण त्यांच्याकडून काम होणार नाहीं. त्यांनां कांहींहि कळावयाचें नाहीं.

राजा—अच्छा! आपल्या जुन्या नोकरांनां माझ्याकडे घेऊन या, ह्मणजे पाहूं—अँ-अँ-आँव.

दिवाण—ते फकिराबरोबर भटकत आहेत, इकडे येण्यास राजी नाहींत.

राजा—फकीर कीं अमीर—अँ-अँ-आँव?

पुरुषोत्तम—वा वा-फकीर अन् अमीर, समुद्र अन् बिंदु, पर्वत अन् ढेंकूळ, वटवृक्ष अन् क्षुद्र वेल! Damn nasty blackguard fools (डॅम नॅस्टी ब्लॅगर्ड फूल्स्!) हरामखोरांनां बुटाच्या लाथखालीं तुडविलें पाहिजे.

राजा—ऐकलें पुरुषोत्तम-अँ-अँ-आँव! मी लवकरच पलाशपुरला जाणार आहें. या हरामखोर फकीराला माझ्यासमोर घेऊन येशील-अँ-अँ-आँव?

पुरुषोत्तम—अवश्य आणीन सरकार. सांगालतर हरामखोराच्या मुसक्या बांधून त्याला हजर करतों.

(कलावंतिणी प्रवेश करितात.)

पुरुषोत्तम—(लगबगीनें कलावंतिणींजवळ जाऊन) Good evening! (गुड इव्हिनिंग.)

राजा—अँ-अँ-आँव- nonsense (मूर्ख नाहींतर).

दिवाण—अहो, हें तुह्मीं काय केलेंत? साहेबांनां good evening (गुड इव्हिनिंग) करण्याविषयीं सरकारनीं हुकूम फर्माविला होता.

पुरुषोत्तम—अरेच्या! छे छे छे! मीं केवढा अपराध केला हा! (दोन्ही गालांवर फडाफड चापट्या मारून घेतो. सगळे हंसतात.)

(डेव्हिस आणि निकोलस साहेब येतात. सगळे अदबीनें उठून त्यांना खडीताजीम देतात. राजा त्यांनां सन्मानपूर्वक बसवितो. नंतर मद्याचे पेले भरून राजा त्यांचे हातांत देतो. राजाला मद्य पिण्यास विनंति करावी ह्मणून प्रथम ते त्याच्यासमोर ग्लास धरतात.)

डेव्हीस—My dear Raja, before we drink your health we have the pleasure to offer you this elixir of life.

राजा—No—thank yours honours—अँ-अँ-ऑव.

(साहेब मद्य पितात. साहेबाबरोबर राजेसाहेबांचें इंग्रजींत काय भाषण झालें ह्मणून एक नोकर पुरुषोत्तमाला हळूच विचारतो.)

पुरुषोत्तम—अरे बेट्या, तुला कशाला त्या पंचाइती! साहेबानें राजाला मद्य पिण्याला आग्रह केला. राजानें सांगितलें आपण पीत नाहीं.

डेव्हीस—(ग्लास टेबलावर ठेवून) Ah, I forget you are a teetotaler Raja. But 'xcuse me, you are royally hospitable—too good for a Bengali Babu.

नोकर—(हळूच पुरुषोत्तमाला) काय ह्मणतो?

पुरुषोत्तम—आणखी काय ह्मणणार? राजा दारू पीत नाहीं, हें बेटा विसरून गेला होता, ह्मणून त्याबद्दल माफी मागतो.

राजा—अँ-अँ-ऑव- That is nothing, my lord of lords. You are everything, my Gods. I do so as you like—अँ-अँ-ऑव.

डेव्हीस—Indeed.

निकोलस—We recognize it.

राजा—That's why I become so big, sirs.

(साहेब पुनः दारु पितात.)

नोकर—(पुरुषोत्तमास) दोघे साहेब राजाला काय ह्मणाले ?

पुरुषोत्तम—अरे मूर्खा, तूं इंग्रजी कां बरें शिकला नाहींस ? ऐक, साहेबाची खूप प्रशंसा करून राजा ह्मणाला, तुह्मांला ज्यांत सुख होईल तें आपण करूं. तो घुबडडोक्या ह्मणाला, ठीक. हा दुसरा पाझवा उंदीर ह्मणाला, आह्मी तें जाणतों. राजा यावर ह्मणाला, ह्मणूनच आपण एवढा मोठा उमराव झालों आहें.

डेव्हीस—Well Raja, how do you like the movement of your countrymen ?

पुरुषोत्तम—(नोकरास) अरे ऐकलेंस काय ? हा बेटा विचारतो आहे कीं, आजकालची स्वदेशी चळवळ राजाला पसंत आहे कीं नाहीं ?

राजा—अँ-अँ-आँव— काय ह्मणतो हा पुरुषोत्तम ?

पुरुषोत्तम--प्रस्तुत चळवळ आपल्याला कितपत पसंत आहे, ह्मणून विचारित आहे.

राजा--इंग्रजींत काय सांगूं—अँ-अँ-आँव ?

पुरुषोत्तम—सांगा कीं Not at all. I hate my countrymen, as I hate hell.

राजा—Excuse my late speaking, Sir. Not at all. I hate my countryman-अँ-अँ-आँव !

डेव्हीस—Indeed. (स्वगत) Treason to your country pays well.

राजा—Oh it is nothing, your honours.

(साहेब पुनः दारू पितात.)

पुरुषोत्तम—(नोकरास) पाहिलेंस अं, माझी योग्यता केवढी आहे ती ? राजाला आयत्यावेळीं उत्तर सुचेना. मला विचारूं लागला. मीं त्याला असें असें सांगा, ह्मणून शिकवलें. तेव्हां राजानें साहेबाला सांगितलें, सध्याची चळवळ आपल्याला मुळींच पसंत नाहीं. आपल्या देशबंधूंचा आपण अगदीं तिरस्कार करतों. साहेब ह्मणाला ठीक. राजा त्यावर ह्मणाला, यांत विशेष कांहीं नाहीं.

निकोलस- Raja, why don't you ask these pretty witches to begin ? Order our glasses to be filled at reasonable intervals.

राजा—All right, my lords and honours--अँ-अँ-आँव.

पुरुषोत्तम—(नोकरास) घे, आतां तुझ्या मनाप्रमाणें झालें. साहेबानें कलावंतिणीच्या नाचगाण्याला प्रारंभ करण्याला आणि मधूनमधून दारूचा बंदोबस्त करण्याला राजाला सांगितलें व त्याप्रमाणें व्यवस्था करण्यासाठीं राजा आंत गेला.

(राजा व्यवस्था करून येतो. कलावंतिणी उभ्या राहतात.)

पियाला भर दे,–
सराब ढाल दे,–
आंखिया लाली नेहि मेरी ।
हो–हो कलेजा फाटे त,
जोस् ना आवत,
जान परेशान करो मत् देरी;
देखूले रूपन कि फेरी ॥

पियाला भर दे,
लाओरे– लाओरे–
ता धिया– धा धिया धिया
थिया थिया– ता– ता थयी
नाचत सब बारनारी;—
घेरी घेरी– घेरी घेरी –रे ॥

(गायन ऐकतां ऐकतां पुरुषोत्तम वेड्यावांकड्या तऱ्हेनें मान हालवूं लागतो. साहेब 'टोफा टोफा' करतात.)

डेव्हीस—(गायन आटोपतांच) टमट्कार ! टमट्कार !

निकोलस—टोफा ! कियाबाट !

(परस्पर परस्परांच्या अंगावर पडतात.)

डेव्हीस—(दारूच्या धुंदींत) Go on–Go on–(चलाव-चलाव.)
निकोलस—Again डोसरा—डोसरा.

[कलावंतिणी दुसरें गाणें गातात.]

सखीरी—
आंखि लगि रहे ओ बनोऽयारी ।
बृकभानुकुमारी, ठडी रही प्यारी,
ठमक ठमक धीर,
बनस्पति नाई थीर;
झांपेओ ब्यान आंचरा ओयारी
—सो बिधुरा नारी ॥

बेनु बाजत, धेनु नाचत,
उडे ओ धूरकि फोयारी ।
नटवर गिरिधर
कांपत थरथर
दर दर नयन लोर बिखारी
तबहुं देखत रसमयी हामारी
—सखीरी !

प्रवेश २
" ३ } silly farce

[पडदा पडतो.]

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

[**स्थळ**—चुनागल्लीच्या राजवाड्यांतील अंतःपुर. राणी इंदुमती आणि अरुंधती बोलत बसल्या आहेत, असा प्रवेश.]

इंदुमती—ते पाहिले का, रस्त्यांतून लोकांचे थवेच्या थवे कसे राष्ट्रगीत गात अनवाणी चालले आहेत ते? कुणीदिखील इकडे कीं तिकडे पहात नाहीं. योगी जसे एकाग्र चित्तानं योगसाधन करित असतात, त्याप्रमाणं आज सर्व कसे अगदीं तन्मय होऊन आपल्या देशासाठीं झटत आहेत. तूंच सांग बाई, नाहींका ईश्वराला याची करुणा यायची?

अरुंधती—कां नाहीं येणार? अवश्य येईल. मनोभावानं कोणतीहि गोष्ट केली, ह्मणजे त्यांत सिद्धि ही यायचीच!

इंदुमती—पण, हें सगळं पाहून मला तर बाई असं वाटूं लागलं आहे कीं, या जगांत कांहीं आतां फार दिवस राहूं नये.

अरुंधती—छे छे, राणीसाहेब, असं अमंगळ नका गडे बोलूं!

इंदुमती—तर मग काय बाई करूं? रात्रंदिवस मी जे कष्ट सहन करित असत्यें, ते काय सांगूं? गुरुजींनीं अगदीं शपथ घालून इकडे देशसेवा करण्याविषयीं सांगितलं, परंतु ऐकतं कोण? इकडची अशी वृत्ती पाहून गुरुजींनां पराकाष्ठेचं दुःख झालं. त्यांनीं अगदीं आग्रहाचं पत्र पाठवून असा वेडेपणा करूं नये, ह्मणून उपदेश केला, पण त्याचा एक कार्डभरदिखील उपयोग झाला नाहीं. उलट, इकडे जास्तच रागाला पेटून त्या पत्राच्या चिंधड्या चिंधड्या करून फेंकून द्यायच्या झाल्या. आपल्या पत्राचा असा अपमान झाला हें गुरुजींच्या कानीं गेलं,-अन् हो, तें गेल्याशिवाय कसं राहील-आणि त्या दिवसापासून त्यांनीं आमच्या घरीं येण्याचं अगदीं वर्ज्य केलं. खरंच सांगत्यें गडे अरुंधती, रात्रंदिवस या चिंतेनं माझ्या अंगांतलं सगळं रक्त एकसारखं जळत आहे, कांहींएक सुचत नाहीं. अन् यापुढं मला कांहीं धडगत दिसत नाहीं!

अरुंधती—राणीसाहेब, अशी रात्रंदिवस चिंता करून काय होणार? अशानं तुह्मी होऊन मात्र कांहीं अनिष्ट घडवून आणाल, दुसरं कांहीं नाहीं. तुह्मी स्वतः तर कांहीं वाईट गोष्ट करित नाहींना? झालं तर मग. राजेसाहेब जाणूनबुजून पापकर्म करित आहेत, त्याला तुह्मी काय करणार?

इंदुमती—तें सारं खरं ग, पण तिकडे अन् मी, तर कांहीं दोन नाहींना ?

अरुंधती—पण, राजेसाहेब कांहीं असं मानित नाहींत ?

इंदुमती—न का मानीनात, पण मला कांहीं त्यांच्याखेरीज गति नाहीं. तिकडून जर पापाचरण करायचं झालं, तर मला कांहीं पुण्याचा संचय करतां यायचा नाहीं. तिकडचं बरंवाईट तेंच माझं बरंवाईट. शास्त्राप्रमाणं पतीच्या पापपुण्याची पत्नीहि वांटेकरीण आहेच. रस्त्यांतील लोक त्यांच्याकडे बोट करून जें कांहीं बोलूं नये असं अभद्र बोलत असतात, तिकडची जी कांहीं निंदा करित असतात, ती ऐकून मला तर बाई मेल्यापेक्षांहि मेलं होऊन जातं. बायकांनीं पतिनिंदा कानांनीं ऐकणं हेंदिखील मोठं पाप आहे. तेव्हां मी घोर पातकी असल्याविना का मला ही अशी पतिनिंदा ऐकण्याचा प्रसंग येता ?

अरुंधती—राणीसाहेब, आपण ह्मणतां तें सारं खरं. पण त्याबद्दल असं अष्टौप्रहर दुःख करित बसण्यापासून काय बरं फायदा ? युक्तीयुक्तीनं, नम्रपणानं अन् मधुर भाषणानं राजेसाहेबांचं मन वळेल आणि ते शुद्धीवर येतील, असं करा.

इंदुमती—बाईग, मीं आजवर नानाप्रकारं विनवण्या केल्या, पाय धरले, रडल्यें, रुसल्यें, उपासतापासादिखील करून पाहिले, पण तिकडे ह्मणून कांहींकेल्या माझी दया आली नाहीं. जमीदारींतील बिचाऱ्या गरीब लोकांवर रोज नाना तऱ्हेचे जुलूम चालले आहेत. त्या त्रासामुळं कित्ती लोक घरंदारंदिखील सोडून गेले. पिढीजाद अन् विश्वासू जुनेजुने नोकर वाडा टाकून चालते झाले. जातांना बिचारे ढळढळां रडले. काय सांगूं गडे, राजाची राणी होऊन या हालअपेष्टा पहाण्याचं माझ्या कपाळीं येतं. तेव्हां पूर्वजन्मीं मींच कांहींतरी घोर पातक केलेलं असलं पाहिजे, यांत संशय नाहीं.

(क्षीरोदा प्रवेश करिते.)

क्षीरोदा—राणीसाहेब, या घरचं माझं अन्नपाणी आज सरलं हो सरलं ! या वाड्यांत चाकरी करून करून माझे काळ्याचे पांढरे केंस झाले, अन् आतां या वयांत माझा हा सर्वस्वी घात झाला की हो ! राणीसाहेब, इतकीं वर्सं आपली चाकरी करून आतां या ह्मातारपणांत अन्नासाठीं मी कुणाच्या हो दाराशीं जाऊं ? असं होईलसं मला कधीं स्वप्नांतदिखील वाटलं नव्हतं हो ! आतां काय हो करूं मी राणीसाहेब ?

इंदुमती—क्षीरोदे, काय झालं ?

क्षीरोदा—आणखी काय व्हावयाचं राहिलं आहे राणीसाहेब ? मेल्या साताजल्मींच्या दुस्मानावरदिखील देवानं असा प्रसंग कधीं आणू नये ! म्हातारा, अन् दोन लेकरं आजवर तुमच्या कृपेनं दोन घांस खात होतीं, आतां कुणाच्या हो दाराशीं जाऊं त्यांनां घेऊन ? (अरुंधतीला उद्देशून) तुम्हीतरी सांगा बाईसाहेब, हा अन्याय नव्हे का ?

अरुंधती—पण काय झालं,काय नाहीं, तें कळल्याशिवाय मीतरी काय सांगूं?

क्षीरोदा—आतां व्हायचं काय राहिलं आहे आणखी ? जें होऊं नये तें झालं बरं बाईसाहेब. माझंच मेलीचं नशीब नि दुसरं काय !

इंदुमती—क्षीरोदे, तुझी ही बडबड आतां राहूं दे. काय झालं तें मला एकदा नीट सांग पाहूं ? तिकडून का कांहीं तुला सांगायचं झालं आहे ?

क्षीरोदा—तेंच हो राणीसाहेब, तेंच! पण राजेसाहेबांनां तरी मी काय म्हणून दोष देऊं? ते त्या दिवशीं कोणी मेले बोकेसंन्यासी इथं चिळायला नव्हते का आले— त्याच मेल्यांनीं आमच्या सोन्यासारख्या राजेसाहेबांनां भुरळ घातली. मेल्यांचं काय चेटुक असेल भगवान जाणे ! तळपट होऊन जाओ मेल्यांचं !

इंदुमती—क्षीरोदे, मघांपासून मी तुला सांगत्यें आहें, कीं काय झालं तें नीट स्पष्ट सांग म्हणून. तरी अजून तुझी ही नस्ती बडबड अन् वटवट चालली आहे. यांत समजावं तरी काय बाई माणसानं ? तिकडून तुला काय सांगणं झालं, तें मला एकदा स्पष्ट सांग पाहूं ?

क्षीरोदा—काय सांगूं राणीसाहेब, माझं कपाळ ? खऱ्याखोट्याचा साक्षी तो नारायण आहे ! पण तो मेला माकडतोंड्या पुरुषोत्तम मला असं सांगून गेला कीं, वाड्यांत आज स्वयंपाक केलाच पाहिजे. त्या मेल्यानं आणखी असंहि सांगितलं कीं, जें कोणी हा हुकूम मानणार नाहीं, त्याला नोकरीवरून एकदम काढून टाकण्यांत येईल. हें कायहो असं भलतंच राणीसाहेब ? आज तिन्ही त्रिभुवनांतहि चूल पेटायची आहे का कुणाकडे ? मग आपणच असा अधर्म कसा करावा ? मी आपली राणीसाहेब, सांगत्यें कीं, मी म्हणून कांहींकेल्या आज चूल पेटवायची नाहीं ! तुम्हाला काय होतं सांगायला, पण असा अधर्म करून मी आपलीं चौदा कुळं नरकांत घालूं कीं काय ! राणीसाहेब, तुम्हाला तरी येऊंद्या हो माझी दया !

इंदुमती—एवढंचना ? मग असं नीट सांगायला काय झालं ? बरं, आतां भिऊं नको. मी करत्यें त्याचा बंदोबस्त. आणि आज तुह्मी सगळ्या आपापल्या घरीं जा, रजा आहे आज तुह्मांला.

क्षीरोदा—देव तुमचं कल्याण करो ! तुह्मांला उदंड औख देओ ! राणीसाहेब, तुमच्या या दयाळु स्वभावामुळंच इथून पाय काढावासा वाटत नाहीं. —अगबाई ! पण ते पहा राजेसाहेब इकडेच येत आहेत.

अरुंधती—मीहि येत्यें आतां, राणीसाहेब. [दोघीहि जातात.

(राजा प्रवेश करितो.)

इंदुमती—आज इकडून का सर्वांनां स्वयंपाक करायला सांगायचं झालं आहे ?

राजा—अँ-अँ-आँव ! अलबत ! कां सांगणार नाहीं—अँ-अँ-आँव ?

इंदुमती—असं भलतंच काय बरं करायचं हें ? आपल्या देशाच्या कल्याणासाठीं आज सर्वत्र उपोषण करायचं ठरलं आहे, अन् साऱ्या देशांत आज कुण्णाकडे चूल पेटायची नाहीं, अन् आपल्याच वाड्यांत आज स्वयंपाक झाला तर आपल्याला देशांतील एकंदर लोक काय बरं ह्मणतील ?

राजा—अँ-अँ-आँव ! झक मारतात देशांतले लोक ! एकूनएक सगळे गाढव आहेत, मला कुणाची पर्वा नाहीं ! ते हरामखोर माझें काय करणार आहेत ? मोठमोठ्या लाटसाहेबांशीं मी शेकहँड करतों, तें ठाऊक नाहीं वाटतें तुला ? साहेबलोक करतील तसेंच मीहि करणार, समजलीस ? मी कोणाला डरत नाहीं!

इंदुमती—(राजाच्या पायाला हात लावून) मी आपल्या पायां पडत्यें, माझं एवढं ऐकायचं. देशाच्या अकल्याणाची गोष्ट यापुढं तरी नाहीं करायची. देवाचा कोप होईल, ह्मणून ह्मणत्यें—

राजा—अँ अँ आँव । माझ्यापुढें देव कोण आहे ? मीच देव आहें. बस्स, आज दहा मण तांदळांचा भात शिजवून रस्त्यांतील भिकाऱ्यांनां मी अन्नदान करणार !

इंदुमती—अहा, मग फारच चांगलं ! अनाथ अपंगांला अन्नदान करणं, यासारखं दुसरं पुण्य नाहीं. देव करो नि इकडे ही सद्बुद्धि अशीच सदोदित राहो. पण ऐकलं का, आज किंनई ही आपली मेहनत फुकट जाणार आहे. सध्या देवच मुळीं

आपल्यावर कोपला आहे, तेव्हां अनाथ अपंगदिखील आपल्याकडच्या अन्नाला स्पर्श करित नाहींत. आज आपण अन्न वांटायला तयार झालां, पण तें नेणार कोण ?

राजा—अँ-अँ-ऑव नाहीं कुणीं नेलें तर रस्त्यांत फेंकून देईन. माझें काय सामर्थ्य आहे हें लोकांनां कळून येईल.

इंदुमती—अग बाई ! काय भलतंच बोलायचं हें ? अन्नाचा कुणी असा अपमान का केला आहे ?

राजा—अँ-अँ-ऑव तूं अगदीं मूर्ख आहेस, तुला कांहींएक कळत नाहीं ! आतां निमूटपणें इथून जा आणि सगळ्यांनां मी सांगतों त्याप्रमाणें स्वयंपाक करायला लाव पाहूं ?

इंदुमती—पण त्या सगळ्यांनां मीं आज मुळीं सुटी दिली आहे. इकडून इतका हट्ट धरणं होईलसं मला मुळींसुद्धां वाटलं नव्हतं. आतां काय ? माझ्याहातून अपराध झाला खरा; काय करायची असेल ती शिक्षा मला करायची.

राजा—अँ ! काय ह्मटलेंस ? सुटी दिलीस सगळ्यांनां ? कुणाच्या हुकमानें सुटी दिलीस ? तूं कोण त्यांनां सुटी देणार ? मी राजा आहें, मी काय पाहिजे तें करीन. तूं कोण आहेस ? तुला बिलकुल कांहीं अधिकार नाहीं. कांहीं हरकत नाहीं, त्या सगळ्यांनां रजा दिलीस तर तूं स्वतां जा आणि स्वयंपाक कर. मी आज सर्वांनां जेवायला बोलावणार. चल चालती हो, उभी राहूं नकोस माझ्यासमोर.

इंदुमती—(खिन्न मनानें) बरं आहे. जात्यें—

राजा—अँ-अँ-ऑव थांब, उभी रहा जरा. मी आणखी काय सांगतों तें नीट ऐकून घे. आज संध्याकाळीं तुला माझ्याबरोबर फिरायला आलें पाहिजे. माझ्या ओळखीचे जितके बडे बडे साहेब आहेत, त्या सर्वांची आज मी तुला ओळख करून देतों. त्या सर्वांनां तूं शेकहँड केला पाहिजेस, त्यांच्यांशीं धीटपणानें आणि हंसतमुखानें तुला बोललें पाहिजे, समजलीस ? अँ-अँ-ऑव ! आपली लौकर पोषाख करून आणि दागदागिने घालून तयार हो !

इंदुमती—इश्श ! हें काय बाई भलतंच बोलायचं ? शोभतं तरी का हें इकडे? माझी कुणी मान कापायला आलं, तरीदिखील मी करायची नाहीं कद्धीं असं. दुसरं हवं तें करायला सांगायचं होऊं दे मी करीन, पण असं भलतंच मी साफ करायची नाहीं. एक वेळ आगींत उडी मार ह्मटलं उडी मारीन, पाण्यांत बुडी मार ह्मटलं बुडी

घेईन, इकडे सुख होत असेल तर मोठ्या आनंदानं मी आपलं हृदय दिखील उघडं करून दाखवीन, पण असं भलतंच कृत्य मी कधीं करायची नाहीं ! आह्मी हिंदुस्त्रिया आपल्याला सूर्याचादिखील स्पर्श होऊं देत नाहीं ! हिंदुस्त्रियांचा जन्म मिळणं ह्मणजे आह्मीं मोठ्या पुण्याईची गोष्ट समजतो ! सतीत्वाची किंमत आह्मी प्राणांच्याहि पलीकडे मानतों. जन्मजन्मांतरीं हिंदूच रहावं, अशी आमची दृढवासना आहे. खरी हिंदुस्त्री प्राणांतींहि असं अमर्यादेचं कृत्य करणार नाहीं. आज मी निर्भीडपणं बोलत आहें, याबद्दल मला क्षमा असावी.

राजा—अँ-अँ-ऑव—मूर्ख नाहींतर ! मी तुला भलतीच गोष्ट करायला कसा सांगेन ? मी नेहमीं तुझ्या कल्याणाचाच मार्ग तुला दाखवीन. माझें ऐकशील तर त्यांत तुझा फायदाच आहे. आज तू राणी आहेस ती माझें ऐकशील तर लवकरच महाराणी होशील ! समजलीस ? मग येणार ना मजबरोबर आज संध्याकाळीं ?

इंदुमती—मला गडे कांहींएक नको ! आह्मी हिंदुस्त्रिया सतीत्वापुढें सोन्या-रूप्याची किंवा मानासन्मानाची पर्वा करित नाहींत. मी इकडच्या पायांची दासी आहें, पायाखालील धुळीप्रमाणं मला पायाखालींच राहूं द्या. मला राणीपणाहि नको, अन् महाराणीपणाहि नको! इकडचा दासीपणा मिळून मी अगदीं भिकारीण झाल्यें, तरी त्यांत मला महाराणीपेक्षांहि अधिक सुख होईल. (पायांवर मस्तक ठेवून) सोडायचा गडे हा भलताच दुराग्रह आतां, अन् हिंदुत्वाची लाज राखायची.

राजा—अँ-अँ-ऑव ! तें कांहीं मी जाणत नाहीं. हिंदुत्वाशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं. मी सांगतों त्याप्रमाणें तुला वागलेंच पाहिजे, समजलीस ? बोल, तू येणार कीं नाहीं माझेबरोबर ? नसेल यायचें तर नीट विचार करून तसें सांग. माझें हें शेवटचें विचारणें आहे. तू ऐकलेंस तर ठीक, नाहींपेक्षां मी दुसरें लग्न करणार—तुझें तोंडदेखील मग पहायचा नाहीं पुनः—समजून रहा !

इंदुमती—तसं केल्यानं जर इकडे सुख होईल अशी खात्री असेल तर खुशाल तसं करायचं, इकडचं सुख तेंच माझं सुख !

राजा—अँ-अँ-ऑव ! ठीक आहे. पहातों कसें काय आहे तें.

[रागानें निघून जातो.

इंदुमती—(हात जोडून) हे अनाथनाथा, पतितपावना, दयामय प्रभो ! माझ्या पतीला सुबुद्धि दे. त्यांच्यावर सदोदित तुझी कृपादृष्टि असूं दे. हे देवा ! या अभागिनीला मात्र आतां त्वरित तुझ्या चरणांजवळ ने. [जाते.

प्रवेश २ रा.

[**स्थळ**—प्रेमानंदाचें कलकत्त्यांतील घर.]

प्रेमानंद—(स्वगत) अहाहा ! आज केवढा हा भाग्याचा दिवस उगवला आहे ! राजमार्गावरील देखावा पाहून शरीर रोमांचित होतें—डोळे आनंदाश्रूंनीं भरून येतात. बाजारपेठ सगळी शून्य झाली आहे—एकूनएक दुकानें बंद. चोहोंकडे सामसूम—जणूं शांततादेवीचें आज सर्वत्र साम्राज्यच पसरलें आहे. सागरासारखा अफाट जनसमूह आज शांतपणें एक मार्गानें चालला आहे. हिंदुमुसलमान भेदभाव विसरून परस्परांस आज प्रेमानें भेटत आहेत. लहानथोर, उच्चनीच, पंडितमूर्ख इत्यादि कोणताहि भेदभाव मनांत न आणतां आज सर्व एकदिलानें देशसेवेला लागले आहेत. शांतता, सुधीरता, सत्कर्मशीलता आणि धर्मपरायणता सर्वांच्या मुद्रेवर स्पष्टपणें दृग्गोचर होत आहेत. या हिंदुस्थानांत आजवर ज्या असंख्य घडामोडी झाल्या, जो अनंत इतिहास झाला, त्या सर्वांमध्यें आजचा हा प्रकार खरोखरच अकल्पित, अभिनव आणि अदृष्टपूर्व असा आहे. अपूर्व आणि पवित्र अशी ही चळवळ पाहून सर्व विस्मित झाले आहेत. हिंदूंच्या या अकल्पित चळवळीनें हिंदुधर्मासारखा अन्य धर्म नाहीं आणि हिंदुनीतिसारखी अन्यत्र नीति नाहीं, असें परमेश्वरानें संपूर्ण जगाच्या प्रत्ययास आणून दिलें आहे.

(सनत्कुमार आणि कित्येक तरुण प्रवेश करितात.)

प्रेमानंद—(सर्वांस) या, बंधूहो या !

सनत्कुमार—आज आपला मंगल दिवस आहे. आजपासून आह्मी चैन, विलास यांनां रजा देऊन मनोनिग्रह करण्यास शिकूं. स्वधर्मनिष्ठ होऊन राहूं. बंधुबंधूंत आतां भेदभाव ठेवणार नाहीं. आज संपूर्ण बंगाल्यांत हिंदु किंवा मुसलमान कोणाच्याहि घरीं चूल ह्मणून पेटली नाहीं. आज सारे अनवाणी चालत आहेत. भाऊ भावाच्या हातांत, मित्र मित्राच्या हातांत, शत्रु शत्रूच्या हातांत, हिंदु मुसलमानाच्या हातांत, मुसलमान हिंदूच्या हातांत आज मोठ्या प्रेमानें राखी बांधित आहेत. चला, प्रेमानंदभाई, तुमचा हात पुढें करा, राष्ट्रीय ऐक्याचें चिन्हस्वरूप अशी ही पवित्र राखी, मला आपल्या हातांत बांधूंद्या !

(सनत्कुमार प्रेमानंदाच्या हातांत राखी बांधून त्याला कडकडून आलिंगन देतो. तरुण 'वंदे मातरं'चा घोष करितात.)

प्रेमानंद—अहा! आजच्या या अत्यंत शुभ मुहुर्तांची महती काय वर्णावी! हिंदूंच्या अनंत जीवनांत, अनंत इतिहासांत याला तुलना नाहीं. हे जगदंबे, जगज्जननी! आमची अवनती काय किंवा उन्नती काय सारे तुझ्या अतर्क्य मायेचे खेळ आहेत! तुझी ही एक लीला आहे!

सनत्कुमार—त्या जगन्मातेची लीला अतर्क्य आहे. आह्मा मानवांनां तिचा कांहींच बोध होणें शक्य नाहीं. तरीहि मातेच्या मंगल नामाचा जप करून 'माते,' 'माते' ह्मणून आह्मी तिला आळवित आहों.

प्रेमानंद—त्या मंगलमय, विघ्नविनाशिनी जगज्जननीला असेंच प्रेमानें रात्रंदिवस आळविलें पाहिजे. वर्षाकाळच्या घनघोर मेघगर्जनेप्रमाणें तिचा मंगल नामध्वनि दिग्दिगंतरीं निनादित होओ! आणि जगदंबेच्या करुणाजलाच्या सिंचनानें आमच्या सर्व पातकांचें क्षालन होओ.

सनत्कुमार—आपली वाणी अवश्य फलद्रूप होईल. नाहींपेक्षां या इतक्याशा अल्प काळांत, हा कल्याणकारक वायु, संपूर्ण देशभर इतक्या जोरानें कसा वाहता? देशाची शोचनीय अवस्था पाहून आज सर्व लोक अश्रुमोचन करित आहेत. देशी उद्योगधंद्यांचा उत्कर्ष व्हावा या हेतूनें आज महाकृपणहि आपला द्रव्यलोभ सोडित आहेत. विलासी—विलायतप्रिय—विलायतभक्त तरुण स्त्रीपुरुष विलायती वस्त्रांचा भराभर त्याग करून जाडींभरडीं देशी वस्त्रें वापरूं लागले आहेत. मोठमोठे लक्षाधीश, कोट्यधीश चैन विलास, ऐषआराम सोडून देऊन आपापलें द्रव्य देशांतील उद्योगधंद्यांची अभिवृद्धि करण्याकडे खर्च करूं लागले आहेत. आतां हळुहळू आपण पूर्वीच्या उन्नतिपथाला लागलों आहों. आणि ह्मणूनच आज माझ्यासारख्या यःकश्चित् दरिद्री गृहस्थाच्या मुलीला रासबाबूंसारख्या सन्मान्य धनिकव्यक्तीनें नुस्ती हळद लावून आपली सून करून घेतली.

प्रेमानंद—आपलें ह्मणणें खरें आहे. पण आपल्या भावाच्या मुलीचें कुठें जमलें का?

सनत्कुमार—मी त्याची आतां काळजी करित नाहीं. परमेश्वरालाच त्याची काळजी आहे.

प्रेमानंद—आपली कांहीं हरकत नसेल तर आपल्या भावाच्या मुलीला मी माझी सून करीन ह्मणून ह्मणतों. दोन्हींकडचा सर्व खर्च मी करीन.

सनत्कुमार—आपण केवळ साधुपुरुष आहां. देव आपलें कल्याण करो.

सर्व तरुण—वंदे मातरं.

एक तरुण—(प्रेमानंदाजवळ जाऊन त्याच्या पायास स्पर्श करून) आपले पदरज मस्तकीं वहावे, अशी आपली योग्यता आहे. धन्य आपलें कुल! धन्य आपला जन्म!! आपल्या जन्माचें आणि आपल्या धनाचें आज आपण सार्थक्य केलें! महाराज, आह्मा तरुणांनां आपला आशीर्वाद असावा. ईश्वर आपल्या या स्तुत्य वर्तनाचें अनुकरण करण्यास आह्मांला सामर्थ्य देओ.

प्रेमानंद—बाबांनों, धर्मावर दृढ श्रद्धा ठेवा, एकनिष्ठपणें मातृभूमीची सेवा करा, ह्मणजे तो करुणाकर तुह्मांला साह्य होईल, व तुमचे सर्व मनोरथ पुरवील.

दुसरा तरुण—तीतर आह्मीं प्रतिज्ञाच केली आहे. खेड्यापाड्यांतून कोष्टी, विणकर वगैरे लोक आपल्या धंद्यांत पोट भरत नाहीं ह्मणून चोऱ्या करून, दरवडे वगैरे घालून पोटाची खळी भरित असत; परंतु आतां तेच लोक पहा, आपला वडिलोपार्जित धंदा पुनः चालू करून सुखानें पोट भरित आहेत. आपल्यासारखे देशभक्त महात्मेहि त्यांनां मोठ्या आनंदान द्रव्यसाह्य करित आहेत. ओसाड पडलेल्या असंख्य खेड्यापाड्यांतून, संध्याकाळ झाली कीं जेथें रात्रकिड्यांच्या भयाण किर्र शब्दाशिवाय आणि वन्यपशूंच्या कर्कश आरोळ्यांशिवाय दुसरा कसलाच आवाज ऐकूं येत नव्हता, तेथें आज कितीतरी रात्र होईपर्यंत सूत कांतण्याच्या चक्रांची घरघर पूर्ववत् ऐकूं येत आहे. शेतकऱ्यांच्या मुलांनीं पुनः शेतकींत मन घातलें आहे. हेंच काय, परंतु पांढरपेशे लोकहि अलीकडे सरकारी शाळांत मिळत असलेलें शिक्षण आपल्या मुलांनां देण्यास कबूल नाहींत. 'किंडरगार्टन' नामक नूतन शिक्षणपद्धतीपासून होणारें अनिष्ट तर आतां सर्वांच्याच प्रत्ययास आलें आहे.

प्रेमानंद—होय, मलाहि तें माहीत आहे. अगदीं थोड्या अवकाशामध्येंच अनेक गांवांतील शाळा बंद झाल्या आहेत. कावळ्याचिमण्यांच्या, गाईह्मशींच्या किंवा कुऱ्यामांजरांच्या चार गोष्टी शिकल्यानें आपल्या मुलांचें व्यवहारज्ञान वाढेल, त्यांची बुद्धि विकास पावेल, किंवा कोणत्या एखाद्या धंद्यांत पडून धनसंचय करण्याची त्यांनां अक्कल येईल हें संभवनीय नाहीं, ही गोष्ट आतां सर्वांच्या प्रत्ययास येऊन चुकली आहे. या किंडरगार्टन पद्धतीची खिचडी खाल्ल्यानें आणि बि-एल-एब्ले केल्यानें आमच्या गरीबांच्या मुलांचा मगज कसा फिरून जातो,

आणि या विद्येच्या दिग्विजयानें आपापला वडिलोपार्जित धंदा करणें त्यांनां कसें आवडेनासें होतें, याचाहि लोकांनां आतां प्रत्यक्ष अनुभव येऊन चुकला आहे. शेतकऱ्याच्या मुलाला वडिलोपार्जित नांगराला हात लावणें लाजिरवाणें वाटतें; परिटाच्या मुलाला कपडे धुण्याची लाज वाटूं लागते; न्हाव्याचा मुलगा वस्त्रा हातांत धरणें मोठी मानहानि समजूं लागतो; बापाचें चाक पाहून कुंभाराच्या मुलाचें डोकें फिरतें; लोहाराचा मुलगा ऐरण पहातांच पळूं लागतो; कोष्ट्याच्या मुलाला मागाची सावलीदेखील सहन करवत नाहीं! पोपटपंचीची वृत्ति स्वीकारून परीक्षारूपी वृक्षांवरून भराभर उडून जाऊन केव्हां एकदा सरकारी नोकरीच्या पिंजऱ्यांत बद्ध होऊन रहातों, अशी सर्वांनां सारखी हांव सुटलेली असते. एकदा या गुलामगिरींत आपणास जखडून घेतलें, ह्मणजे आपल्या जन्माचें सार्थक झालें, असें सर्व समजतात. ब्राह्मणांचीं मुलें पहा! वेदमंत्र नकोत यजमानांच्या इथली वृत्ति नको आणि तें पंचांगहि नको. कसेंतरी करून एखादी कारकुनाची जागा मिळाली कीं मोक्षप्राप्ति झाली! सारांश काय? तर आजकालचें उच्च शिक्षण घ्या किंवा खालच्या प्रतीचें शिक्षण घ्या, आह्मांला दोन्हीहि सारखींच अनिष्ट होत आहेत.

(पडद्यांतून ' वंगभूचा विजय होओ सतत सदया ईश्वरा '
असा मधुर गीतध्वनि ऐकूं येतो.)

सनत्कुमार—अहाहा! किती मधुर-किती सुंदर गीत हें?

(फकीर प्रवेश करितो.)

प्रेमानंद—(फकीरास) नमस्कार बुवाजी.

फकीर—बाबांनों, मी मुसलमान—फकीर आहें.

प्रेमानंद—आपल्या मुखांतून असें गाणें?

फकीर—बाबा, मी देशासाठीं फकीर झालों आहें-आणि ह्मणून हें मातृभूमीचें गीत गात सगळीकडे फिरत असतों.

सनत्कुमार—धन्य आपली! आपण सत्पुरुष आहां. आपल्याला आमचा प्रणाम असो. या, बंधू हो या, या महात्म्याच्या हातांत आपण सर्व राखी बांधूंया.

(' वंदेमातरं ' चा घोष करित सर्वजण फकिराच्या
हातांत राखी बांधतात.)

सनत्कुमार—(फकिरास) साईजी, आपल्याला राग येणार नाहीं तर एकवार आपला वृत्तांत ऐकण्याची आमची इच्छा आहे.

फकीर—मला राग येण्याचें काय कारण बावांनों ? पूर्व बंगाल्यांतील नबाबाच्या वंशांतील एका धनाढ्य गृहस्थाचा मी पुत्र आहें. माझा पिता या सांप्रतच्या प्रचंड राष्ट्रीय चळवळीच्या अगदीं विरुद्ध आहे. आणि मींतर स्वताला त्या चळवळीला वाहून घेतलें आहे. अर्थात्, मला देशसेवेसाठीं पितृस्नेहाला आंचवावें लागलें; इतकेंच नव्हे, तर पित्याच्या इतराजीमुळें घरहि सोडावें लागलें. पित्यानें माझा त्याग केल्या दिवसोपासून मीं हा वेष स्वीकारला आहे. माझी स्वताची धनावर किंवा रत्नांवर मुळींच आसक्ति नाहीं. माझ्या सुवर्णतुल्य मातृभूमींत धनरत्नांची पुनरपि विपुलता झालेली पाहिली, ह्मणजे मी कृतार्थ होईन. ईश्वराच्या कृपेनें आपल्या देशाच्या उन्नतीला सांप्रत प्रारंभ तर झालेला आहे; आतां अनेक बाजूंनीं आपल्याला प्रयत्न मात्र केले पाहिजेत. गांवोगांवीं हल्लीं असंख्य हातमाग चालू झाले आहेत. अन्नान्न करून तडफडणारे, रोगांनीं, दुःखांनीं जर्जर झालेले, आमचे कष्टाळु कारागीर आतां निदान पोटभर जेवतील, हें पाहून मला आनंदाचें भरतें येत आहे; परंतु आनंदानें बेहोष होण्याचा दिवस अजून फार दूर आहे. आणि ह्मणूनच गृहत्याग करून, ऐषआराम टाकून या फकीरवेषानें शहरांतील धनवानांच्या दारोदार हिंडून त्यांनां जागें करण्याचा क्रम मीं स्वीकारला आहे. त्यांनीं शहरांतल्या शहरांतच गुंग होऊन राहून आतां चालावयाचें नाहीं. मलेरियानें आणि रोगाच्या दुसऱ्या सांथींनीं खेड्यापाड्यांतील लोक हैराण झाले आहेत; त्यांतच आणखी अन्नाचें आणि पाण्याचें दुर्भिक्ष दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळें मृत्यु त्या बिचाऱ्यांच्यापुढें आ पसरून बसला आहे. धनिक लोकांनीं खेड्यापाड्यांत राहण्याचें अगदींच सोडून दिल्यामुळें ही अनिष्ट दशा ओढवली आहे. तेव्हां त्याचा प्रथम प्रतिकार करणें, हें त्यांचेंच कर्तव्य आहे. धनिक आणि विद्वान् लोकांनीं स्वतः खेड्यापाड्यांत वस्ती केली पाहिजे. आसपासचें जंगल तोडून तेथें शेतकरी लोकांनां शेतकीसाठीं जमीन तयार करून दिली पाहिजे. अन्नाचें आणि पाण्याचें दुर्भिक्ष पडणार नाहीं असे कांहींतरी उपाय योजले पाहिजेत. ह्मणजे देशाचें स्वास्थ्य वाढून उन्नति खात्रीनें होईल. गोरगरिबांनां मोलमजुरी मिळून त्यांनां पोटभर अन्न मिळेल. अशा दिशेनें प्रयत्न करण्याविषयीं

मी सर्वांनां उपदेश करित असतों. आणि मोठ्या समाधानाची गोष्ट ही आहे कीं, बऱ्याच लोकांच्या मनावर या उपदेशाचा परिणाम होऊं लागला आहे. अल्ला या माझ्या संपूर्ण देशबांधवांनां अशी सुमति देऊन त्यांचे हातून देशोन्नतीचें पवित्र कार्य घडवून आणो, हेंच रात्रंदिवस माझें त्याजजवळ मागणें आहे.

सनत्कुमार—आपल्यासारखे उदार अंतःकरणाचे महात्मे या उद्योगांत आहेत, त्याअर्थीं आपली उन्नति खात्रीनें आणि त्वरित होणार, यांत संशय नाहीं. आह्मीहि चोहोंकडे लोकांनां हाच उपदेश करित फिरूं.

फकीर—फार उत्तम. सर्वांनीं एकनिष्ठपणें मातृभूमीची सेवा करण्याचें व्रत चालविल्यास तो परमात्मा आपल्याला खरोखर साह्य झाल्याविना रहाणार नाहीं. विलायती यंत्रें—विलायती तंत्रें, विलायती वस्त्रें—विलायती भूषणें, विलायती शिक्षा—विलायती दीक्षा या सर्वांनीं मुग्ध होऊन जाऊन आह्मीं आजवर आपल्या देशाची राखरांगोळी करून टाकली. देव करो आणि आमचा हा मोह आतांतरी कायमचा दूर होओ.

गझल.

वंगभूचा विजय होओ सतत सदया ईश्वरा ।
ऐक्यमहती कळुनि येओ सुदृढ तीच्या लेंकरां ॥ धृ० ॥
वंग-जल-फल-मृत्तिका-वायु-तृण-तरुमालिका ।
पुण्य होउत तव कृपेनें दे अह्मांतें या वरा ॥ १ ॥
वंगभूगृहपत्तनें । उपवनें उटजें वनें ।
पूर्णतेतें वरुत अवघीं न्यून हो न तयां जरा ॥ २ ॥
वंगलोकसमाज हा । भिन्नवर्णचि जो पहा ।
प्राण गणुनी देशकाजा एक होउ कृपाकरा ॥ ३ ॥
वंगकार्यदृढव्रता । वाङ्मया सुमनोरथा ।
सफलता वितरीं प्रभो जनिं हेतु अन्य न किंकरा ॥ ४ ॥
व्रत घेतलें खर जें करीं । स्वप्राणही त्यजितां परी ।
त्यजुं त्याप्रती न कधीं तरी । या निश्चया निज दे करा ॥५॥

[जातात.

प्रवेश ३ रा.

[**स्थळ**—चुनागल्लींतील राजवाडा. परिचारिकांची बैठकीची जागा. राजवाड्यांतील परिचारिका गात आहेत, असा प्रवेश.]

सर्व परिचारिका—

[**चाल**—अहा जडली । दर्शनयोगें ही॰]

महा अधमा । सेवावृत्ति खरी । जी तापद जगतीं भारी ॥ धृ॰ ॥
निजबांधवहितघातक नरपशु स्तुतिपाठक गौरांचे जे ।
पदवी–माना फार भुकेले नामधारकचि 'राजे'।
दास्य यांचें । लज्जास्पद साचें ॥ १॥
क्षुद्रहि तो गौरकाय बघुनी कांपति थरथर जे देहीं ।
स्त्रीपरिवारीं परी मिरविती सत्ता थोरचि गेहीं ।
दास्य यांचें । लज्जास्पद साचें ॥ २ ॥
गौरांच्या पादुकाहि पुशिती शिरिंच्या वसनीं आनंदें ।
स्वबंधुहितलवसाधनिं परि ज्यां शिरोवेदना बाधे ॥
दास्य यांचें । लज्जास्पद साचें ॥ ३ ॥

पहिली परिचारिका—

परसेवेहुनि उदरीं कंटक भरणें गमतें खचित बरें ।
गोरसदधिविक्रय करुनी मी कंठिन जीवित सारें ।
अधम परि हा । सेविन कधिं न पहा ॥ ४ ॥

दुसरी परिचारिका—

पुष्पें वेंचुनि वनिंचीं विक्रय करिन तयांचा बाजारीं ।
लाज कशाची तयांत ? 'माळिण' ह्मणोत मज नरनारी ।
नीच परि हा । सेविन कधिं न पहा ॥ ५ ॥

तिसरी परिचारिका—

प्रियकर मम बहु निर्धन जरि तो वरिन तयातें प्रेमभरीं ।
कृषिकर्मीं उभयतां शिणुनियां कंठूं दिन संसारीं ।
दुष्ट परि हा । सेविन कधिं न पहा ॥ ६ ॥

चवथी परिचारिका—

जोंवरि मम कर-पद रक्षित हे, चिंतन तोंवरि कां ह्मणुनी ? ।
वसनें विणुनी उदरभरण मम केविं तरी करिन जनीं ।
अधम परि हा । सेविन कधिं न पहा ॥ ७ ॥

पांचवी परिचारिका—

ईशवराच्या कृपाप्रसादें पुत्र एक मजला सुगुणी ।
मातृ-पोषणा खचित करिल तो; चिंता मनिं मी न गणीं ।
नीच जन हा । सेविन कधिं न पहा ॥ ८ ॥

सहावी परिचारिका—

आप्तबंधुहीना दीना मी ईशा अर्पुनि भारातें ।
भिक्षावृत्तिस आदरुनी जगिं करिन उदरपूर्तीतें ।
दुष्ट परि हा । सेविन कधिं न पहा ॥ ९ ॥

प० परिचारिका—(पुरुषोत्तम येत आहे हें पाहून) तो कोणग मेला बोकड इकडे येत आहे तो ?

दु० परिचारिका—मेल्याला झाडूचा मार पाहिजे वाटतं ! आमच्या राजाला अवदसा आठवली असल्यामुळं ते साहेबलोकांचे बूट पुशित असतात, अन् हा मेला सदा राजाची थुंकी झेलित असतो ! मेल्याचा अवतार तरी पहा कसा दिसतो तो ! तुह्मी बहुतेक इथं नवीन असल्यामुळं तुमची थट्टामस्करी करण्यासाठींच मेला इकडे येत असावा. मला तो ओळखतो. मी इथं असल्यास बरोबर मौज होणार नाहीं, ह्मणून मी पलीकडे लपून बसत्यें. पुरी खोड मोडा मेल्याची.

[जाते.

पुरुषोत्तम—(प्रवेश करून) कसं काय सरूबाई, काय चाललं आहे ?

प० परिचारिका—आपण कोण हो ?

पुरुषोत्तम—अँ ! मी कोण ? मला तुह्मी ओळखित नाहीं ? या वाड्यांतील खरा राजा मीच. तुह्मी ज्याला राजा ह्मणतां, तो माझ्या अर्ध्या वचनांत आहे. मी सांगेन तसें तो करील.

ति० परिचारिका—मग इकडे आह्मा बायकामाणसांत आपलं काय काम ? इकडे कशाला आलां ?

पुरुषोत्तम—कामामुळेंच तर मी इकडे आलों आहें ? तुमच्यापैकीं कोणत्या सुंदरीला या वाड्याची मुख्य परिचारिका करावें, तें समक्ष पाहून ठरविण्याकरितां आलों आहें, समजलांत ?

प० परिचारिका—पण आह्मी कांहीं तुह्मांला ओळखित नाहीं; तुह्मी इथून जा कसे. बायकामाणसांत पुरुषानं येणं चांगलं नव्हे. आह्मांला लाज वाटते.

पुरुषोत्तम—वाः सरू, माझ्याजवळ ग कसल्या लाजतां ? मी तर तुह्मा सगळ्यांचा यजमान आहें. मलातर तूंच सर्वांत सुंदर दिसतेस, तेव्हां तुलाच मी या सर्वांची मुख्य नायकीण करीन.

प० परिचारिका—जळलं लक्षण ! तुह्मी इथून जा कसे ?

पुरुषोत्तम—सरू, मी थट्टेनें नाहीं सांगत, खरेंच, तूं मला फार आवडतेस. तुला मी नायकीण करीन. वाड्यांतील सर्व सत्ता माझ्या हातांत आहे. तूं माझें मन खूष ठेविल्यास मी तुझा पगार वाढवीन. आणि कामहि फारसें करावें लागणार नाहीं.

प० परिचारिका—या असल्या नोकरीवर मी लाथ मारत्यें ! तुह्मी बऱ्या बोलानं इथून लवकर जा पाहूं ?

ति० परिचारिका—गरीब झालों तरी आह्माला कुळाशीळाची कांहीं चाड आहे, समजलां ? परकी पुरुष पाहिला कीं आह्मांला भय वाटतं. तुह्मी इकडे कां आलां ? सरूबाईनीं सांगितल्याप्रमाणं बऱ्या बोलानं इथून जा, नाहींतर उगाच शोभा मात्र करून घ्याल !

पुरुषोत्तम—अग, तुमची भीति दूर करण्याकरितांच तर मी इकडे मुद्दाम आलों आहें. वेड्या कुठल्या ! मी काय वाघ आहें कीं तुह्मांला खाऊन टाकीन—

तुह्मी मला भितां त्या ? ये सरू, लाजूं नकोस, ये, जवळ ये. तूं सुंदर गातेस ह्मणून ऐकतों. मला एक गोडसें गाणें गाऊन दाखीव पाहूं. या सगळ्यांच्या देखत गायाला तुला लाज वाटते होय ? (इतरांस) तुह्मी इथून जा पाहूं. (पुढें होऊन तिचा हात धरतो.)

प० परिचारिका—अरे मेल्या मांगा, तुझ्या मनांत असं कपट का भरलं आहे ? थांब (जोरानें हाताला हिसडा देऊन कोनांत असलेला झाडू घेऊन पुरुषोत्तमाच्या पाठीवर, तोंडावर वगैरे सारखे तडाखे ओढिते. बाकीच्या तिघीचौघी त्याला चापटपोळ्यांचें व मुष्टिमोदकांचें यथेच्छ भोजन घालतात. दोघीजणी त्याच्या उपरण्याचा त्याच्या गळ्याला फांस घालून दोन्ही शेवटें ओढून धरतात.)

पुरुषोत्तम—ओय-ओय—अयाई !—मेलों—मेलों—(कासावीस होऊन) याउपर असं करणार नाहीं—सोडा—सोडा—पायां पडतों—सोडा—सोडा—

प० परिचारिका—(जोरानें पुरुषोत्तमाचा कान पिळून) येशील का मेल्या पुनः असा फाजीलपणा करायला ? मेल्या, गाणं ऐकणार नाहीं (तोंड वेगाडून) गोडश गाणं ? (अधिकच जोरानें कान पिरगळून.) याच कानानं का ?

पुरुषोत्तम—बाबारे!ओय—ओय—ओय ! नाहीं—नाहीं—कद्धीं नाहीं—प्राण गेला तरी नाहीं—ओय—ओय—सोडा ! सोडा--मेलों--मेलों--पायां पडतों-सोडा—

प० परिचारिका—(जोरानें त्याच्या पाठीवर लाथ मारून) चल मेल्या, तोंड काळं कर.

पुरुषोत्तम—(धापा टाकीत पळत पळत) अरे बापरे ! या बायका नव्हत ! कैदासिणी-राक्षासिणी—

[जातो.

प० परिचारिका—चला बायांनों, आपापल्या घरीं जाऊं. चाकरी पतकरली, कीं ही अशी विटंबना करून घ्यावी लागते.

[सर्व जातात.

प्रवेश ४ था.

[स्थळ—पाटलडांगा येथील शाळागृह. प्रेमानंद, सनत्कुमारप्रभृति समाजांतील पुढारी मंडळी छात्रसंमेलनाला जमली आहे.]

सनत्कुमार—आमच्या उन्नतीची वेळ आतां जवळ येत चालली आहे. या स्वदेशी चळवळीबरोबर मोठमोठ्या सन्मान्य आणि विद्वान् लोकांचें लक्ष्य आमच्या मुलांच्या शिक्षणाकडेहि वेधलें आहे. देशांतील उद्योगधंदे ऊर्जितावस्थेस आणण्याकरितां जसें देशांतील भांडवल जमा होत आहे, आपापल्या सामर्थ्यानुरूप सर्वजण त्या कामीं जशी मदत करित आहेत, तशीच मदत देशी विश्वविद्यालयाची आवश्यकता मनांत आणून तिकडेहि करित आहेत. देशी विश्वविद्यालय स्थापन करण्यासाठीं लागणारें द्रव्य हळुहळू यथासामर्थ्य चोहोंकडून येत आहे. आणि अशा विश्वविद्यालयाची लवकरच स्थापना झाल्यावांचून आतां खात्रीनें रहात नाहीं. हल्लीं जी कनिष्ठप्रतीच्या शिक्षणाची पद्धत सुरू करण्यांत आली आहे, तिच्यायोगानें आमची औद्योगिक उन्नति होण्याऐवजीं अवनति मात्र होणार आहे. उच्चप्रतीच्या शिक्षणापासूनहि आमच्या कारागीर लोकांनां कांहीं फायदा होईल, ही आशा करावयासच नको. आणि ह्मणूनच सांप्रत देशी विश्वविद्यालयाची अत्यंत आवश्यकता आहे. आमच्या मुलांचें कनिष्ठप्रतीचें शिक्षण काय किंवा उच्चप्रतीचें शिक्षण काय, आमच्या राष्ट्रीयप्रगतीला उपयोगीं पडेल, आमच्या राष्ट्रोन्नतीला कारणीभूत होईल, असेंच असलें पाहिजे. देशी विश्वविद्यालय स्थापन झाल्याविना अशाप्रकारचें शिक्षण मिळणें शक्य नाहीं. या विश्वविद्यालयाची स्थापना हल्लीं असलेल्या विश्वविद्यालयांशीं स्पर्धा करण्याकरितां करावयाची नाहीं. कारण, याचे उद्देश निराळे आणि त्यांचे निराळे. तो जगदीश्वर आमचे मनोरथ पूर्ण करणार नाहीं काय ?

प्रेमानंद—अवश्य करील.

कित्येक तरुण—या आपल्या विश्वविद्यालयाची स्थापना कधीं होईल बरें ? आह्मी त्या आशेवर बसलों आहों. आमच्याकडून कांहीं मदत होण्यासारखी असेल तर सांगा, आह्मी ती करण्यास जिवाकडेहि पहाणार नाहीं.

प्रेमानंद—बाबांनों, असे अधीर होऊं नका. हीं अशीं महत्वाचीं कार्यें दिवसा दोन दिवसांत होत नसतात. हल्लीं तुमचें शिक्षण चाललें आहे तसेंच चालूंद्या, त्यांत व्यत्यय येऊं देऊं नका, असें माझें तुह्मांला सांगणें आहे. तुमच्या शिक्षकमंडळीचा विचार घेऊनच आह्मी हें सर्व काम करणार आहों. योग्य वेळ आली, ह्मणजे ते होऊनच तुह्मांला राष्ट्रीय विश्वविद्यालयांत पाठवितील.

सनत्कुमार—माझ्या तरुण मित्रांनों, तुह्मीं आपल्या शिक्षणांत व्यत्यय येऊं देऊं नका. आपला शिक्षणक्रम तुह्मी तूर्त असाच पुढें चालवा. दारिद्र्यानें ग्रस्त झालेल्या या देशांत विश्वविद्यालय स्थापन करण्यासाठीं लागणारी विपुल द्रव्यसामुग्री अशी एकदम का जमावयाची आहे? एक एक लक्ष रुपये देण्याचें जरी कित्येकांनीं अभिवचन दिलें आहे, तरीहि अद्याप पुष्कळ पैशाची जरूर आहे.

एक तरुण—पैशासाठींच अडलें असेल तर मग मोठी धास्तीच आहे.

प्रेमानंद—तुह्मांला ती धास्ती बाळगण्याचें कारण नाहीं. बाबांनों, विद्यार्थी-दशेंत तुह्मी या असल्या गहन विचारांत लक्ष्य घालूं नये. तुह्मी मुलें ह्मणजे आमच्या साऱ्या आशेचें आणि भरंवशाचें स्थळ आहां. तेव्हां तुमचें कल्याण कसें होईल, हा विचार करण्याचें काम आमचें आहे; आणि तें योग्य रीतीनें बजावण्यास आह्मी तयार आहों. आपणां सर्वांनां माहीतच आहे कीं, ईश्वरकृपेनें मला पैशाचा कांहीं तोटा नाहीं. बरें, माझा परिवार ह्मणाल तर एक ह्मातारी आई, पत्नी आणि एकच पुत्र. यांशिवाय कोणी नाहीं. याच माझ्या एकुलत्या एक मुलाशीं हे माझे परम मित्र सनत्कुमार यांच्या भावाच्या मुलीचा नुक्ताच विवाह झाला. मला कांहीं एवढ्या संपत्तीची खरोखर जरूर नाहीं. माझा हा लहानसा संसार अगदीं थोड्याशा प्राप्तीवर सहज चालण्यासारखा आहे. हा सगळा विचार करून मी आपणां सर्वांसमक्ष सांगतों कीं, माझ्या सर्व संपत्तींतून माझ्या संसाराला अवश्य तितकाच भाग ठेवून बाकी सर्व संपत्ति मीं माझ्या देशाच्या कल्याणासाठीं अर्पण केली आहे.

(सर्व मंडळी चकित होऊन स्तब्ध रहाते.)

सनत्कुमार—धन्य धन्य आहे आपली—

प्रेमानंद—सनत्कुमार, आपल्या भावाची मुलगी यापुढें श्रीमंताची सून राहिली नाहीं. ती यापुढें एका सामान्य कुटुंबाची गृहलक्ष्मी आहे. तुह्मांला याबद्दल खेद

वाटूं देऊं नका. माझा जन्माचा ध्यास पूर्ण झाला, ह्मणून मला यावेळीं आनंद झाला आहे.

सनत्कुमार—(गहिंवरून) काय सांगूं ? मी आनंदानें बेहोष झालों आहें. माझ्यानें बोलवतसुद्धां नाहीं. मी जणूं स्वप्नसृष्टींत विराजमान झालों आहें. प्रेमानंद, तुह्मीं आपल्या जन्माचें सार्थक केलेंत; आणि ह्या आमच्या मातृभूमीनें—रुग्ण,भग्न, शतधा छिन्न, विलासदग्ध—वंगभूमीनें आपल्यासारख्या महापुरुषाला आपल्या हृदयावर धारण करून आपलें सार्थक्य करून घेतलें. प्रेमानंद, माझ्या मुलीबद्दल मला मुळींच खेद होत नाहीं. आपण आज जें महत्कार्य केलें, त्यासाठीं जरी तिला निखालस भिकारीण व्हावें लागलें असतें, तरीहि मीं त्याबद्दल सुखच मानलें असतें. अहो, धनाचा सद्व्यय झालेला पाहून कोणाला आनंद होणार नाहीं ? अहा ! आज त्या भिकारी भोलानाथाचें मला स्मरण होत आहे ! अन्नपूर्णा ज्याची गृहलक्ष्मी, संपूर्ण ब्रह्मांड ज्याच्या अन्नानें परिपालित-त्याच्या घरीं अन्नाचा तोटा ! प्रेमानंद, आज साऱ्या जगाला आपण उदाहरण घालून दिलें !

(तरुण मंडळी आनंदानें जयघोष करूं लागते.)

एक तरुण—(दुसऱ्या कित्येक तरुणांस उद्देशून) हं, पहातां काय ? टाका गाडीचे घोडे सोडून. प्रेमानंद बाबूंनां आज योग्य मान दिल्याशिवाय आपल्याच्यानें राहवत नाहीं. चला, त्यांनां गाडींत बसवून पुष्पहारांनीं विभूषित करून आपण गाडी रस्त्यानें ओढीत नेऊं या.

(ासानें जयघोष करित सर्व प्रेमानंदाभोंवतीं गर्दी करितात.)

प्रेमानंद—हें काय करतां बाबांनों ? निष्कारण असे कष्ट घेण्यांत काय बरें अर्थ आहे ?

सर्व तरुण—आमच्यावर दया करून उठा, आमचा हिरमोड करूं नका. आह्मांला यांतच आनंद वाटतो.

['वंदे मातरं'चा घोष करित प्रेमानंदाची गाडी ओढित सर्व जातात.

प्रवेश ५ वा.

[**स्थळ**—प्रेमानंदाचा वाडा. प्रेमानंदाची आई अन्नपूर्णा आणि पत्नी सरोजिनी, दिवाणखान्यांत बसल्या आहेत.]

अन्नपूर्णा—इतकी रात्र झाली, तरी माझा बाबा आला कां नाहीं घरीं अजून ? त्याच्या शोधाला दोघांतिघांनां पाठविलं, त्यांचाहि पत्ता नाहीं ! समजावं तरी काय बाई माणसानं ? मेला मायेचा जीव ह्मणजे वेडा असतो. माझा बाबा जरा दृष्टिआड झाला, कीं नाहीं नाहीं त्या कल्पना येऊं लागतात वेड्या मनांत.

सरोजिनी—सभा तर पांच वाजतांच आटपायची होती! मग एवढा उशीर कां झाला, कांहीं कल्पना होत नाहीं. त्या दिवशींच्या सभेसारखी कांहीं गडबड तर नाहींना झाली ? आई जगदंबेनंच रक्षण करावं.

परिचारिका—(घाईघाईनें प्रवेश करून) आईसाहेब, हें आहेतरी काय ? बाबासाहेबांच्या गाडीचे घोडे सोडून टाकले आहेत, अन् ती एवढी मोठी गाडी शेंकडो लोक गात गात हातांनीं ओढून आणताहेत ?

अन्नपूर्णा—ह्मणजे ? बाबा माझा गाडींत तरी आहेका पण ?

परिचारिका—होय तर आईसाहेब. बाबासाहेब आंत बसले आहेत, व फुलांच्या माळांत त्यांनां जणूं काय बुडवून टाकलं आहे !

सरोजिनी—हें आहे तरी काय ?

अन्नपूर्णा—मलाहि बाई कांहीं समजत नाहीं, हें काय गौडबंगाल आहे तें !

परिचारिका—मी आणखी एकदा पाहून येत्यें बरंका आईसाहेब ! [जाते.

अन्नपूर्णा—हिनं सांगितल्यावरून माझ्या बाबावर कांहीं संकट आलेलं दिसत नाहीं. तसं असतं तर लोकांनीं त्याच्या गळ्यांत अशा फुलांच्या माळा कशाला बरं घातल्या असत्या ? हं, आतां माझ्या ध्यानांत आलं. माझ्या सद्गुणी मुलानं आज कांहींतरी सत्कार्य केलं असावं.

(तरुण मंडळी प्रेमानंदाच्या वाड्यांत प्रवेश करिते. गाडींतून खालीं उतरून प्रेमानंद आईच्या पायांवर मस्तक ठेवतो.)

प्रेमानंद—आई ! माझ्या अन्नपूर्णा आईचें घर मीं या घटकेपासून अन्नशून्य करून टाकलें. आई, मीं आपली सर्व संपत्ति देशहितासाठीं देऊन टाकली.

अन्नपूर्णा—चांगलं केलंस, बाबा फार चांगलं केलंस. मला म्हातारीला रे त्या संपत्तीशीं काय करायचं आहे? माझी सर्व संपत्ति काय ती तूं. त्या जगदंबेनं तुला उदंड आयुष्य दिलं, म्हणजे मग मला दुसरं कांहीं नको. बाबा माझा मजजवळ असला म्हणजे सात राजांच्या संपत्तीपेक्षांहि मला अधिक आहे. अरे, तूं माझी आंधळीची काठी--तूं माझा जीव–तूं माझा प्राण आहेस. तुझ्या या कृत्यानं माझा आत्मा अगदीं संतुष्ट झाला.

प्रेमानंद—(प्रेमानें गहिंवरून) परमेश्वरानें अशा आईच्या पोटीं मला जन्मास घातलें, हें मी माझें मोठें भाग्य समजतों. '**जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी**' असें कविवाक्य आहे. माझ्या आईसारखी माउली आणि आपल्या भरतभूमीसारखी जन्मभूमि, या गोष्टी मागल्या जन्मींच्या सुकृतानेंच प्राप्त होतात, यांत शंका नाहीं. अशा मातेच्या सहवासानें दगडसुद्धां उद्धरून जातील. आई! जन्मभूमीच्या उद्धारार्थ आणि असंख्य देशबांधवांच्या कल्याणार्थ आह्मीं जी ही स्वदेशी चळवळ सुरू केली आहे, ती नेटानें चालविण्याचें सामर्थ्य आमचे अंगीं यावें, असा तूं आह्मांला आशीर्वाद दे. तुझ्या पुण्याईच्या बळानें आणि आशीर्वादानें आमच्या या दुर्बळ स्नायूंत शक्तीचा संचार होईल, आमचीं निःसत्त्व मनें देशाभिमानाचें खडतर व्रत चालविण्याच्या कामीं दृढ होतील, आणि आमच्या पूर्वजांचीं मुखें उज्वलित करण्यासारखीं शुभ कृत्यें आमचे हातून घडून आमच्या या जन्माचें सार्थक होईल, असा माझा दृढ विश्वास आहे. देशकार्यासाठीं नुसतें घरदार, किंवा दुसरी ऐहिक संपत्तीच काय, पण प्रत्यक्ष हा देहहि खर्ची घालावा लागला तरी तो घालण्याची प्रत्येक आर्यपुत्राच्या मनाची तयारी पाहिजे. तशी स्फूर्ति तुझ्या आशीर्वादानें व्हावी, हीच माझी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे.

[प्रेमानंद आईच्या पायांवर पुनः मस्तक ठेवतो. तरुण 'वंदे मातरं'चा मोठ्यानें घोष करित करित जातात.

अन्नपूर्णा—परमेश्वर तुझी इच्छा पूर्ण करील. चल, आतां घरांत चल, केव्हांची मी तिष्ठत बसल्यें आहें इथें.

[जाते.

प्रेमानंद—चल, मीहि आलोंच तुझ्या मागोमाग. (सरोजिनीचें स्मितमुख पाहून) वाः, इकडे तर सरोजिनी उत्फुल्ल दिसत आहे!

सरोजिनी—चंद्रोदय झाल्यावर ती कां फुलणार नाहीं ? माझी चरणापाशीं एक विनंति आहे.

प्रेमानंद—कळूंद्या काय आज्ञा आहे ती.

सरोजिनी—आपली सगळी धनदौलत आपल्या देशाकरितां द्यायची झाली, असं ऐकल्यापासून मला किती बाई आनंद झाला ह्मणून सांगूं ! माझ्या बाबांनं दिलेलं हें जवाहीर अन् सोनं जर असंच सत्कारणीं लागेल, तर—

प्रेमानंद—छे:छे: छे:छे: ! हें स्त्रीधन आहे. तुझ्या अलंकारांवर माझा मुळींच हक्क नाहीं. मी त्याला हात लावणार नाहीं !

सरोजिनी—ह्मणजे—हें काय बाई असं भलतंच बोलायचं ! पत्नी ही पतीची अर्धांगी ना ? अन् माझ्या अलंकारांवर इकडचा हक्क नाहीं ?

प्रेमानंद—(स्वगत) हिनें तर मला बरोबर अडविलें ! (उघड) मग काय, ह्मणणें काय आहे आपलें ?

सरोजिनी—नरेंद्रनाथाच्या मनांत स्वदेशी बांगड्यांचा कारखाना काढायचा आहे ना ? पैशामुळं ह्मणे त्याचं अडून राहिलं आहे. त्याला जर हें जवाहीर दिलं तर स्वदेशी बांगड्यांचा कारखाना उभारतां येईल.

प्रेमानंद—मग आपल्याला हे अलंकार नाहींसे होतील ते ?

सरोजिनी—(प्रेमानंदाकडे प्रेमदृष्टीनें पाहून) मला हा एवढा अलंकार असल्यावर आणखी दुसऱ्या अलंकाराची काय आहे बाई जरूर ? माझ्या देशभगिनींच्या हातांत स्वदेशी चुडे पडले ह्मणजे ते माझेच अलंकार आहेत असं मी समजेन. मग करायचं ना एवढं ?

प्रेमानंद—हो हो, तुझ्या अशा स्वदेशभक्तिपूर्ण सदिच्छेच्या आड कोणाच्यानें येववेल? तुझ्या या आत्मत्यागानं माझा अंतरात्मा कसा संतुष्ट झाला आहे. आनंद-सागराला भरतें येत आहे. कंठ दाटून आला. (आंतून अन्नपूर्णा हांक मारते) चल, आईनें हांक मारली वाटतें, तर आंतच जाऊं. (एकीकडे) खरेंच, जगांत असा सुयोग क्वचितच जुळून येतो !

[जातात.

प्रवेश ६ वा.

[**स्थळ**—नामधारी राजेबहाद्दरांचा पलाशपुर येथील वाडा. राजेसाहेब, दिवाणजी, पुरुषोत्तम वगैरे बसले आहेत. मुसलमान फकीर समोर उभा आहे, असा प्रवेश.

पुरुषोत्तम—सरकार, त्या फकिराला हुकमाप्रमाणें समोर आणला आहे, त्याला एकवार warning (ताकीद) द्या, ह्मणजे झालें. नाहींपेक्षां Hand him over to the police (द्या गुलामाला पोलिसच्या ताब्यांत) !

राजा—(फकिरास) अँ-अँ-ऑव-तुला इथें कशासाठीं आणला आहे, माहीत आहे ?

फकीर—कशासाठीं ?

राजा—अँ-अँ-ऑव-तूं आमच्या जमीदारींत उपद्रव मांडला आहेस, तुला पोलिसच्या ताब्यांत दिला पाहिजे—

फकीर—पण माझा अपराध ?

राजा—अँ-अँ-ऑव-अ-अपराध ? स्वदेशी चळवळींत सामील होण्यासाठीं तूं लोकांनां उत्तेजन देत असतोस. रस्त्यांतून 'वंदे मातरं'चा घोष करून तूं सर्वांचीं डोकीं फिरवून टाकलीं आहेस, माहीत नाहीं तुला ?

फकीर—मग यांत माझा अपराध काय झाला? सोन्यासारखा वंगदेश धुळीस मिळाला, लक्षावधि लोक अन्नपाण्यावांचून मरून जात आहेत, अशा वेळीं देशी व्यापारधंद्यांनां ऊर्जितावस्थेस आणण्याची खटपट करणें, हें प्रत्येक बंगाली मनुष्याचें कर्तव्य नव्हे काय ? राजा, तुला दोन विघे जमीन मिळाली आहे, दोनतीन अक्षरांची एक पदवी तूं मिळविली आहेस, पैशाच्या जोरावर तूं नामधारी राजा बनला आहेस, आणि यामुळें मदानें ग्रस्त झाला आहेस. तुझ्या शरीरांतील सारें रक्त तुझ्या डोक्यांत चढलें आहे. गर्वानें धुंद होऊन तूं मुळीं उफराटा ह्मणजे डोक्यानेंच चालूं लागला आहेस! दीन दुनियेची तुला दाद राहिली नाहीं. ऑाण याच कारणानें तूं आपल्या मातृभूमीचा आज शत्रु होऊन तिचें अमंगल

चिंतित आहेस. परंतु तुझ्या या टुरटुरण्यापासून या देशाचें काडीइतकेंहि नफानुकसान होणें शक्य नाहीं, हें तूं पक्कें समजून रहा.

पुरुषोत्तम—Shut your lips. Defamation, Maharaja—Conviction certain. (तोंड बंद कर. महाराज, ह्या बदनामी करित आहे. याला खात्रीनें शिक्षा होईल.)

राजा—(क्रुद्धस्वरानें) अँ-अँ-ऑव-कारे ए! कोणासमोर तूं हें बोलत आहेस, विसरलास वाटतें?

फकीर—छे छे! कसा विसरेन? एका स्वदेशद्रोही मनुष्यासमोर मी हें बोलत आहे.

पुरुषोत्तम—चू-प!

राजा—अँ-अँ-ऑव-भारीशी तुला गुर्मी चढली आहे? माझा असा अपमान करतोस?

फकीर—राजा, तुझा मी अपमान करित नाहीं. तुझ्या हिताची गोष्ट तुला सांगत आहें. अरे, हा तुझा देश तुझा अपमान करित आहे. पहात नाहींस का, रस्त्यांतील यःकश्चित भणंगभिकारीदेखील मँचेस्टरच्या कापडाप्रमाणें तुला त्याज्य समजत आहे? वकीललोक तुझ्यातर्फें काम चालविण्यास खुषी नाहींत, डाक्टरलोक तुझ्या वाड्यांतील रोग्यांनां औषधपाणी देण्यास तयार नाहींत, हेंच तर काय, परंतु तुझे इतक्या वर्षांचे नोकरचाकरदेखील भराभर तुझा आश्रय सोडून चालले आहेत. मनापासून तुझ्या वाड्यांत पाय ठेवण्यास कोणीहि इच्छित नाहीं. अरे, माझ्या बोलण्यानें तुझा अपमान होतो ह्मणतोस आणि या सगळ्याची तुला कांहींच का लाज वाटत नाहीं?

राजा—अँ-अँ-ऑव-या सगळ्याला कारण हरामखोरा त-त-तूंच आहेस! तुझेच हे सारे उपद्व्याप आहेत!

फकीर—राजा, असा निष्कारण गैरसमज करून घेऊं नकोस. मी कांहीं तुझा शत्रु नाहीं. उलट तुला सुचलेली ही दुर्बुद्धि पाहून माझें अंतःकरण व्यथित होत आहे. तो जगदीश्वर जर कधीं तुला सुबुद्धि देईल, तर तूं खात्रीनें समज, मला मनापासून सुख होईल.

राजा—अँ-अँ-ऑव-अ-आग लाव तुझ्या त्या जिभेला आणि त्या तुझ्या देशालाहि पाहिजे तर! मला त्याचें मुळींच सुखदुःख नाहीं. तुझी जीभ आतां

लांबत चालली, तिला अगोदर कांहीं तोकडी केली पाहिजे. माझ्यासमोर माझी नालस्ती करतोस हरामखोरा? दम धर, तुला चांगली शिक्षा देतों. तुला रग आलेली दिसते!

पुरुषोत्तम—होय सरकार, याला फार मस्ती आली आहे. खोड मोडेल अशी शिक्षा केली पाहिजे गुलामाला.

फकीर— खरें बोलायला कुणाची भीति आहे? तुझी काय माझें करणार?

राजा—अँ-अँ-आँव-काय करणार? तुला प-प-पोलिसाच्या ताब्यांत देणार.

फकीर—पोलिसच्याच ताब्यांत देणार ना? अँः, त्याला मी भीत नाहीं. तुह्मांला वाटेल तें खुषाल करून घ्या.

राजा—अँ-अँ-आँव-बरें आहे. पाहून घेऊं. पहिल्यानें या आमच्या पहारेकऱ्यांकडून तुझी पाठ जरा मऊ करवतों आणि मग आहेच पोलीस.

पुरुषोत्तम—सरकार, आपला विचार अगदीं योग्य आहे. या गुलामाची अशीच खोड मोडली पाहिजे.

फकीर—ठीक आहे. माझी तयारी आहे. बोलवा तुमच्या पहारेकऱ्यांनां, उगाच विलंब नको.

राजा—अँ-अँ-आँव! हें पहा, एकदा आमचा हुकूम झाला ह्मणजे मग तो कालत्रयीं फिरायाचा नाहीं, खूब समजून रहा. अद्यापिहि चुकलों ह्मणून ह्मण, अद्यापिहि क्षमा माग.

फकीर— क्षमा? आणि ती तुझ्याजवळ मागूं? कशाबद्दल? राजा, अरे तुझ्या अन्नावर पुष्ट होऊन सदैव तुझी थुंकी झेलण्यास तयार असलेल्या (पुरुषोत्तमाकडे बोट दाखवून) या अधमापेक्षांहि तूं अधम आहेस! हे तुझे स्तुतिपाठकच कायते स्वार्थासाठीं तुझी स्तुति करतील, बाकी इतर कोणी तुझें नांवदेखील तोंडावाटे काढणार नाहीं!

राजा—(संतापानें) अँ-अँ-आँव-त-तुझी जीभ फारच लांबत चालली? कोण आहेरे तिकडे?

पुरुषोत्तम—(गडबडीनें हात जोडून उभा राहून) हं हं हं! सरकार, आपण कशाला इतकी तसदी घेतां? मी बोलावतों त्यांनां. पहारेकरी? ए पहारेकरी?

(कित्येक पहारेकरी पुढें येऊन राजाला अदबीनें मुजरा करून समोर उभे रहातात.)

राजा—अँ-अँ-ऑव-प-पहातां काय? बांधा या हरामखोराच्या मुसक्या.

फकीर—(दोन्ही हात पुढें करून) या भाई, या, तुह्मांला काय? तुह्मी हुकमाचे चाकर. राजा सांगतो आहे तसें तुह्मांला केलेंच पाहिजे. त्या दिवशीं आपण परस्परांनां बंधु मानून परस्परांच्या हातांत राख्या बांधल्या, आज या राजाच्या आज्ञेवरून तुह्मी या तुमच्या देशबंधु फकिराच्या हातांत बेड्या घाला.

(पहारेकरी एकमेकांकडे पहात उभे रहातात.)

राजा—अँ-अँ-ऑव-म-मीं काय सांगितलें तें ऐकलेंत? मग बांधा लवकर. अँ-अँ-ऑव!

पुरुषोत्तम—चलो, Make haste (जल्दी करो).

एक पहारेकरी—(अंगांतील डगला, पट्टा वगैरे काढून जमिनीवर ठेवून) सरकार, हें काम आमच्या हातून व्हायचें नाहीं, आह्मांला क्षमा असावी. आह्मांला अशा चाकरीचीहि जरूर नाहीं.

[डगले, पट्टे काढून ठेवून पहारेकरी निघून जातात.

फकीर—धिक्कार असो तुला! राजा, अरे या सामान्य पहारेकऱ्यांत जें तेज आहे, तेंदेखील तुझ्यांत नाहीं. तुझ्याजवळ बोलून मी आपली जीभ आतां विटाळवू इच्छित नाहीं.

[फकीर जातो. त्याच्याबरोबर राजाच्या पदरचे कांहीं कामदार लोकहि उठतात.

एक कामदार—(जातां जातां) महाराज, क्षमा असावी. आपल्याइथला आमचा शेर संपला.

[सर्व कामदार जातात.

राजा—(पुरुषोत्तमाकडे पाहून) अँ अँ-ऑव-पुरुषोत्तम, आमचा वाडा तर बहुतेक ओसाड पडला? तुला जवळ ठेवला कशाला? यासाठींच काय? या स्वदेशी चळवळीविरुद्ध तू सर्वांची मनें वळवणार होतास, तीं अशींच काय?

पुरुषोत्तम—आपण असे अधिर कां होतां सरकार? या सगळ्या हरामखोरांनां बुटाच्या लाथेखालीं नाहीं तुडविलें, तर मला विचारा.

राजा—तुझ्या बोलण्यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. अँ–अँ–ऑव समजलास? मीं काढली आहे याला युक्ति शोधून.

[राजा उठून पुढें चालूं लागतो.

पुरुषोत्तम—(राजाबरोबर जातां जातां) सरकारची बुद्धि आहेच तशी! सरकारच्या मनांतली युक्ति उत्तम असलीच पाहिजे. महाराजांपुढें आमची कसली गेली आहे बुद्धि लागून?

[दोघेहि जातात.

[पडदा पडतो.]

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

[**स्थळ**—पलाशपुरचें जंगल. कालीमातेपुढें कित्येक दरवडेखोर जमले आहेत, असा प्रवेश.]

एक दरवडेखोर—अरे, दिवस खालीं जायची वेळ झाली, तरी आपल्या नाइकांचा पत्ता नाहीं ? आतां आई भवानीची पूजा होणार कधीं अन् आपण आपल्या धंद्याला लागणार कधीं ? पलाशपुर तर इथून फार दूर आहे–ध्यानांत आहेना आज राजवाड्यावर मोहीम न्यायची तें ? असें एखादें मोठें घबाड सांपडल्याशिवाय आपलें कसें चालणार ? चला, आपापलीं हत्यारें सगळीं नीट परजून ठेवा. तिथें आज अगदीं निश्चिंत मनानें लूट करायला हरकत नाहीं. आपल्याला कोणी पकडायला येईल ही धास्तीच नको. वाड्यांत चिटपांखरूंहि कुणी राहिलें नाहीं.

दुसरा दरवडेखोर—अहो पण राव, ही बित्तंबातमी आपल्याला लागली कशी ?

तिसरा दरवडेखोर—(रस्त्याकडे पहात पहात) हं--हं--पाहिलींत कां ती शिकार चालली आहे ? सावज पण काय सावज दिसतें आहे.

(सर्व तिकडे पहातात.)

पहिला दरवडेखोर—अरे होय, बरोबर न्याहाळलेंस ! (त्याची पाठ थोपटून) आहेसच तूं तसा हुषार ! चला, शिंच्याला पकडून आणूं. भला तडाक्यांत आला आहे.

(सगळे जाऊन फकीराला पकडून आणतात.)

पहिला दरवडेखोर—चल, काढ सारें बाहेर तुझ्याजवळ काय आहे तें बऱ्या बोलानें ?

फकीर—मजजवळ रे बाबांनों काय असावयाचें ? बोलूनचालून फकीर मी !

दु० दरवडेखोर—जाऊं दे रे गब्या याला. कुणी साधु माणूस दिसतो आहे, चांगल्या माणसाच्या उगाच कशाला वाटेस जा ?

प० दरवडेखोर—अरे हो, मोठा आला आहे ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगायला. तुझा कोणी काका मामा आहे वाटतें हा ?

फकीर—बाबांनों, या कामांत तुह्मांला काय आनंद वाटतो ? चोरी करणें, लूटफाट करणें, एखाद्याची हत्या करणें, इत्यादि घोर पातकांचीं फळें भोगावीं लागणार नाहींत, असा का तुमचा समज आहे ?

प० दरवडेखोर—पण आह्मी कुणाला सांपडूं तेव्हांची कीं नाहीं ही गोष्ट ?

फकीर—मनुष्याच्या हातीं नाहीं कधीं सांपडलां, ह्मणून काय झालें ? सर्वसाक्षी अल्ला वर बसला आहे, त्याची भीति नको का बाळगायला ?

प० दरवडेखोर—अहो सांईमहाराज, ठेवा तें. आपलें सारें ब्रह्मज्ञान आपल्याजवळ. या तुमच्या कोरड्या ब्रह्मज्ञानानें आमचीं पोटें भरतील का सांगा पाहूं ? मी तर असें ह्मणतों कीं, आह्मीं पत्करलेला धंदा जर वाईट असला, तर त्याचा दोष त्या तुमच्या अल्लाकडेच आहे. इमानानें धंदा करून पोटाला मिळत नाहीं, तर काय आह्मीं उपाशीं मरावें ? पोटाला द्यायला नको अन् कांहीं बरेंवाईट केलें तर त्याबद्दल झडती घ्यायला पाहिजे, हा कुठला न्याय ? तुमच्या त्या असल्या अन्यायी अल्लालाच पहिल्यानें एका खोलशा विहिरींत ढकलून दिला पाहिजे !

(दरोडेखोरांचा नाईक प्रवेश करितो.)

फकीर—बाबांनों, असें कधींहि बोलूं नये. तो सर्वसाक्षी अल्ला पूर्ण दयाळू आहे. त्याच्या राज्यांत अविचार होणें कालत्रयीं शक्य नाहीं. आतां तुह्मी विचाराल कीं, तर मग सांप्रत आह्मांला इतके कष्ट कां भोगावे लागतात ? बाबांनों, यांत त्याचा कांहींच अन्याय नाहीं. आपण हीं आपल्याच कर्मांचीं फळें भोगित आहों. आजवर आमच्या या देशांत जे सहस्रावधि लोक अन्नावांचून मेले, याचें कारणहि आमचाच अदृष्टदोष होय, असें मी समजतों. आतां आपला देश धनधान्यानें समृद्ध होत चालला आहे, हीदेखील त्या दयामय जगदीश्वराचीच कृपा आहे. तेव्हां बाबांनों, जाणूनबुजून तुह्मी या पापांच्या राशी डोक्यावर कां घेतां ? आतां आमच्या दुःखाचे

दिवस सरले. देशांत हल्लीं मोलमजुरीला किंवा अन्नपाण्याला तोटा राहिला नाहीं. बाबांनों, आपापल्या घरीं जा. मुलेंमाणसें घेऊन आनंदानें रहा. परमेश्वरानें तुह्मांला शक्ति दिली आहे, सामर्थ्य दिलें आहे, त्यांचा चांगल्या कामांकडे उपयोग करा. इमानानें धंदारोजगार करून आनंदानें रहा. या असल्या घोर पातकांचे यापुढें धनी होऊ नका.

नाईक—(टोळींतील सर्व लोकांस उद्देशून) गड्यांनों, हे सांई सांगतात तें खरें आहे. प्रत्यक्ष परमेश्वर आज या फकीराच्या वेषानें आपला उद्धार करण्यासाठीं येथें आला आहे. अहाहा! काय याची ही मधुर वाणी! माझा जीव थंड झाला. (समोर असलेल्या कालीमातेकडे बोट करून) आई जगदंबेनेंच आमच्या उद्धारासाठीं आज या फकीराला इकडे पाठविलें आहे. सर्वजण याचे पाय धरूंया, नाहींतर आई भवानीचा आमच्यावर कोप होईल. (सर्वजण फकीराचे पाय धरितात.)

नाईक—(फकीरास हात जोडून) सांईजी, भवानी माता आमच्यावर रागावणार नाहीं, अशी तिला विनंति करा. मातेची दया असल्याविना आह्मांला गति नाहीं. या घटकेपासून आह्मीं हा धंदा सोडून दिला. आजपासून आह्मी आपला जातीव्यवसाय करून इमानानें मिळेल त्यावर चरितार्थ करून राहूं. मुलांमाणसांत राहून इमानानें पोट भरल्यावर हें पाप कोणाला पाहिजे? (आपल्या लोकांस) चलारे बाबांनों, सगळीं हत्यारेंपात्यारें पार मोडून टाका. आईची मूर्ती डोकीवर घेऊन आपण घरीं जाऊं. येथें रहाण्याचें आतां काम नाहीं. अहो, आमची ही निंद्य वृत्ति पाहून प्रत्यक्ष आमचीं बायकामुलेंदेखील आमचा तिरस्कार करितात.

(सर्वजण आपापलीं हत्यारें मोडून टाकतात.)

फकीर—चला, बंधूहो, आपण बरोबरच जाऊं.

[सर्व जातात.

प्रवेश २ रा.

[स्थळ—डेव्हीससाहेबाचा बंगला. डेव्हीस आणि निकोलस बोलत बसले आहेत.]

डेव्हीस—Well Nicholas, you see there is a lull all over the country, now—things have very much quieted down, and to tell you the truth, I fancy that we made a miscalculation of the trend of events. After all let us hope for the best, and *all's well that ends well.* (लोकांचीं प्रक्षुब्ध झालेलीं मनें आतां बरींच शांत होत चाललीं आहेत. खरें ह्मणशील, तर लोकमताचा आणि प्रस्तुत स्थितीचा ओघ कोणीकडे आहे, याची अटकळ बांधण्यांतच आपली चुकी झाली. असो झालें तें झालें, 'ज्याचा शेवट गोड तें गोड' हेंच खरें.)

निकोलास—I expected as much. You see, these poor natives of India are perfectly in a condition when men do not know how to discern between right and wrong. They are simply trying to find a means by which they could eke out an existence for themselves. (खरें सांगू तुला, अगदीं अव्वलपासूनच माझा होरा असाच धावत होता. या बिचाऱ्या हिंदीप्रजेला योग्यायोग्य पहाण्याला अवकाश कसा तो मुळींच नाहीं. आजची वेळ कशीतरी पार पडली, उद्यां कसें होईल या विवंचनेंतच बापडे अष्टौप्रहर चूर असतात.)

(चपरासी सलाम करून डेव्हीससाहेबाच्या हातांत एक कार्ड देतो.)

डेव्हीस—(कार्डावरील नांव वाचून) Ah, bother him—that blasted Raja again. (आली पुनः ही ब्याद !) (चपराशाला) बाबूको अंदर लाव. The devil bless him. (मरो शिंचा एकदाचा !)

(चपरासी सलाम करून जातो आणि राजा व पुरुषोत्तम यांस आंत घेऊन येतो.)

डेव्हीस—(राजाला पाहून) Well, what is it, what do you want ? (कां, काय झालें ? काय पाहिजे ?)

(साहेबाची बोलण्याची तऱ्हा पाहून राजा गोंधळून पुरुषोत्तमाच्या तोंडाकडे पाहूं लागतो.)

पुरुषोत्तम—सरकारस्वारी कशासाठीं आली आहे, काय पाहिजे आहे, ह्मणून साहेब विचारताहेत ?

राजा—अँ-अँ—Great hodge—podge, Sir, in my Palaspur Kingdom. (माझ्या पलाशपुरराज्यांत मोठी बंडाळी माजली आहे सरकार.)

डेव्हीस—Your *Kingdom* ? What am I to do ?

(राजा पुरुषोत्तमाकडे पाहूं लागतो.)

पुरुषोत्तम—आपलें राज्य राज्य ह्मणतां तें कोठलें ? आणि बंडाळी झाली तर आह्मीं काय करावें, ह्मणून विचारताहेत साहेब.

राजा—अँ-अँ-आँव-अ-All chores and dacats; servants gone. Help me sir and oblige. (माझ्या राज्यांत सारे चोर आणि दरवडेखोर भरले आहेत. नोकरमाणसें निघून गेलीं. मला मदत करा सरकार, माझेवर कृपा करा.)

डेव्हीस—You silly idiot, you expect me to help you—you who have been a traitor to your country !

राजा—(वेड्यासारखें पुरुषोत्तमाकडे पाहून) अँ-अँ-आँव-क काय ह्मणाले साहेब ?

पुरुषोत्तम—(स्वगत) साहेबाच्या जिभेला आज फांटे फुटले आहेत ! (उघड) महाराज, तो आपल्याला अजागळ, मूर्ख ह्मणून असें ह्मणतो कीं, आपल्या देशाशीं ज्यानें विश्वासघात केला त्याला माझ्याकडून मदत मिळण्याची आशा आहे काय ?

राजा—अँ--अँ--आँव--क—Can't catch your tale sir (आपलें ह्मणणें मला कळलें नाहीं सरकार.)—अँ-अँ-आँव !

(हें ऐकून डेव्हीससाहेब रागानें लाल होतो आणि खुर्चीवरून उठून उभा रहातो.)

डेव्हीस—You insolent brute, what the hell do you mean? Chaprasi, show him out. (काय, काय ह्मणालास ? बेवकूफ गद्धा ! चपराशी, याला बाहेर काढ.)

राजा—(पुरुषोत्तमास) अँ अँ-ऑव-क-काय झालें रे याला ? हा असा बिथरला कसा एकदम ?

पुरुषोत्तम—महाराज, कांहीं झालें नाहीं; आपण आतां जें कांहीं बोललां त्याचा राग आला आहे त्याला. Can't catch your tale असें जें आपण ह्मणालां, त्यांत याचा गैरसमज झालासें दिसतें. आपण T-a-l-e टेल ह्मणजे गोष्ट अशा अर्थानें तो शब्द उच्चारला होता; परंतु या मूर्खाला तें मुळींच न समजून त्यानें t-a-i-l ह्मणजे शेंपूट असा अर्थ केला, आणि रागानें सरकारला पशूचीदेखील उपमा दिली. असो, कांहीं हरकत नाहीं; सरकार, मी एका क्षणांत त्याचा हा राग दूर करतों.

राजा—अँ-अँ-ऑव-क-कर बाबा कांहीं तरी क-कर लवकर-अँ-अँ -ऑं--ऑव.

पुरुषोत्तम—(डेव्हीस साहेबास उद्देशून.)By 'tale' he did not mean quadruped tail sir, but t-a-l-e=tale your honour.

डेव्हीस— Any way, I don't want him. Take him away— Take him away. (तें कांहीं असो, तो माझ्या दृष्टीसमोर नको. त्याला इथून घेऊन जा—नीघ)

राजा—(पुरुषोत्तमास) अँ-अँ-ऑव-अ-अरे मूर्ख आहे बेटा ! हं, चल लवकर, बाहेर पड कसा, मारायचाहि हा वेळेस !

पुरुषोत्तम—खरोखरच महाराज, याचा कांहीं भरंवसा येत नाहीं. इतकें मीं स्पष्ट समजावून सांगितलें कीं tale हा शब्द महाराजांनीं तुमच्या बोलण्याला उद्देशून घातला होता. शेंपटीला नव्हे, तरीदेखील हा आपला घुश्शांतच ! तरीदेखील हा ह्मणतो कीं, मला तुमची जरूर नाहीं—तुह्मी इथून चालते व्हा. चला महाराज, आपण बाहेर गेल्याशिवाय याचा संताप कमी व्हायचा नाहीं.

डेव्हीस—(ते लवकर बाहेर पडत नाहींत असें पाहून) Look sharp let us get rid of you (हां निघा. तोंड काळें करा).

पुरुषोत्तम—चला महाराज, चला लवकर, नाहीं तर धक्का मारून बाहेर घालवायला कमी करणार नाहीं.

निकोलस—Look here Raja, just for a moment think over your past conduct towards your country. We Britons never extend the right hand of fellowship, much less of friendship to one who has been guilty of conduct so mean as yours.

राजा—(कांपत कांपत पुरुषोत्तमास) माझ्या तर कानाला आज दडाच बसला आहे. काय सर्दी झाली कीं काय कांहींच समजत नाहीं. अँ–अँ–आँव ! पण कायरे पुरुषोत्तम, हा काय ह्मणांला ?

पुरुषोत्तम—महाराज--या चोरांनीं आपल्याला ठकवलें. त्यांच्या दोघांच्याहि बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तो ह्मणतो कीं, आपल्या देशासंबंधीं आपलें आजवरचें वर्तन कशाप्रकारचें होतें याचा आपण विचार करावा. आणि शिवाय मोठ्या आढ्यतेनें ह्मणतो कीं, जे आपल्या देशाशीं अशा कृतघ्नपणानें वागतात त्यांच्याशीं इंग्रजलोक बोलायचेदेखील नाहींत—मग स्नेहाची गोष्ट कशाला पाहिजे ?

राजा—अँ–अँ–आँव–ख–खरें आहे; इतक्या दिवसांनीं आज माझ्या अंतःकरणांत प्रकाश पडला. आज मला माझी चूक समजून आली. या इंग्रजलोकांचें ह्मणणें अगदीं खरें आहे. आजपासून हेच माझे गुरु–यांच्या पायाची धूळ मीं मस्तकावर घ्यावी, अशी यांची योग्यता आहे. (डेव्हीस आणि निकोलस यांनां उद्देशून) साहेब, माझी चूक झाली, मला क्षमा करा. आपल्या स्नेहाला मी खरोखरच पात्र नाहीं, I go out. (मी जातों.)

[दोघेहि जातात.

डेव्हीस—Thank God! 'Tis a riddance. Well, come along Nicholas, let us have the move. (पीडा गेली! ब्याद कायमची टळली. चल, आपण फिरायास जाऊं.)

जातात.

प्रवेश ३ रा.

[**स्थळ**—पलाशपुर येथील राजवाड्यांतील अंतःपुर. इंदुमती आणि अरुंधती बोलत बसल्या आहेत, असा प्रवेश.]

इंदुमती—काय बाई करावं ! हा आमचा वाडा तर अगदीं ओसाड झाला. या एवढ्या मोठ्या राजवाड्यांत कुणाला हांक मारीन ह्मटलं, तर माणूस राहिलं नाहीं. नाहीं ह्मणायला ती क्षीरोदा, तो सृष्टिधर अन् आमचे दिवाणजी, एवढी मंडळी कायती अजून जवळ आहे. हीदिखील राहिली आहे ह्मणजे काय, त्यांचा सारा जीव तिकडे आहे ह्मणून. नाहींपेक्षां आज घोटभर पाणी द्यायलाहि कुणी मिळालं नसतं. पण इतकं झालं, तरी तिकडचे डोळे ह्मणून कांहीं अजून उघडत नाहींत. मला तर किनई आतां हा जीव कसा अगदीं नकोसा झाला आहे बाई.

अरुंधती—हे सगळे नशिबाचे खेळ आहेत. एकदा ही गृहदशा सरूंद्या ह्मणजे मग राणीसाहेब तुह्मीच पहाल राजेसाहेबांची बुद्धि कशी आपोआप ताळ्यावर येते ती.

इंदुमती—पण गडे, हा भोग सरायचा तरी कधीं ?

(क्षीरोदा प्रवेश करिते.)

क्षीरोदा—अहाहा ! राणीसाहेब, काय सांगूं तुह्मांला ! आमची पुण्याईच जबर. संपली आज आमची ग्रहदशा. अहा ! केवढं आमचं भाग्य ! उगाच का आह्मी पुनः सुखांत पडलों ? कां, बोलत नाहीं राणीसाहेब आपण ?

इंदुमती—अग, पण झालं तरी काय क्षीरोदे ?

क्षीरोदा—आणखी काय व्हायचं राणीसाहेब ? आपण इतके कष्ट सोसलेत, त्याचं आज सार्थक झालं. आतां काळजी करायला नको.

इंदुमती—(अरुंधतीला) क्षीरोदेचं बोलणं ऐकून माझं मन गडे असं अगदीं अधीर कां बरं झालं आहे ? आई जगदंबेनं अखेरीस आपलं गाऱ्हाणं ऐकलं ?

अरुंधती—हो गडे, मलाहि असंच वाटूं लागलं आहे. कांहींतरी चांगला झटका बसला कीं मनुष्य आपोआप शुद्धीवर येत असतं. पुष्कळ वेळ असं झालं आहे.

इंदुमती—(व्यग्र मनानें) क्षीरोदे, बाई नीट सांग पाहूं मला काय झालं तें ? हें पहा, या आनंदाच्या बातमीबद्दल तुला योग्य बक्षीस द्यायला मी विसरायची नाहीं.

क्षीरोदा—राणीसाहेब, आपल्या भाग्याला पार राहिला नाहीं. राजेसाहेबांचं मन फिरलं, साफ फिरलं बरं राणीसाहेब! कुठंसे गेले होते, ते हे आत्तांच परत आले, अन् ह्मणूं लागले कीं, आजवर झालं तें झालं, पण आतां आपल्या लोकांनां सुख होईल असे आपण वागणार. आपल्या सगळ्या चाकरांनोकरांनां आपलं नांव सांगून परत बोलवा–राणीसाहेब, हें काय? आपल्या डोळ्यांत पाणी कां आलं आहे? आपण रडतां आहां, राणीसाहेब!

इंदुमती—(पदरानें डोळ्यांतील आनंदाश्रु पुसून काढून) हें घे बाई तुला बक्षीस. (हातांतील एक कंकण काढून क्षीरोदेला देते.) तूं आज मोठ्या आनंदाची बातमी आणिलीस, क्षीरोदे. तूं ह्मणत्येस तसं खरोखरच असेल तर तुझ्या नातसुनेला मी एक सुरेख सोन्याची माळ करून देईन बरं.

क्षीरोदा—(आनंदानें बेहोष होऊन) मला सोनं नाणं घेऊन काय करायचं आहे, राणीसाहेब? तुमच्या या सोन्यासारख्या डोळ्यांतून आसवं निघण्याचं बंद झालं, ह्मणजे मला सगळं कांहीं मिळालं. राणीसाहेब, आपणां उभयतांनां देवानं सुखांत ठेवलं, ह्मणजे आह्माला सगळीं सुखं मिळालीं. बरं, मी येत्यें आतां.

[जाते.

इंदुमती—(अरुंधतीस) गडे, पण हें खरंच का? कीं आपलं स्वप्न? आज कित्तीतरी दिवसांत स्वारीनं इकडे पायदिखील टाकला नाहीं; तेव्हां तिकडे काय चाललं आहे मला कांहीं समजलं नाहीं. (इतक्यांत राजाला समोरून येतांना पाहून) अग बाई, पण ती पहा स्वारी इकडेच आली!

अरुंधती—मी बाई जात्यें आपली! हो, तुमच्या दोघांच्या गोष्टींत उगाच माझी अडचण कशाला?

[जाते.

(राजा प्रवेश करितो.)

राजा—(इंदुमतीजवळ जाऊन प्रेमानें तिच्या पाठीवर हात ठेवून) ऐकलेंस का, आज आमचे डोळे लख्ख उघडले. आमची चूक आह्मांला कळून आली. अंध बनून आह्मी आजपर्यंत आपल्या धर्माशीं तसेंच देशाशीं प्रतारणा केली; पण ज्यांनां आजवर आह्मी आपले ह्मणून समजत होतों, तेच आतां आमच्यावर उलटले. तेच आतां आमचा उपहास करित आहेत. झालें तें ठीक झालें. आमच्यासारख्यांनां असेंच बक्षिस मिळालें पाहिजे. आह्मी त्यांच्या उपहासास खरोखरच पात्र आहों. गुरुवचनाचा अवमान करणें ह्मणजे महापाप आहे, ह्मणून जें तूं सांगत होतीस तेंच

खरें मीं महापातक केलें आहे. परंतु आतां मला पूर्ण पश्चात्ताप होत आहे; आणि ह्मणूनच तुझी क्षमा मागण्याकरितां मी आलों आहें. करशील का या पातक्याला क्षमा ?

इंदुमती—हें काय हें भलतंच बोलायचं ? मी इकडच्या पायांची दासी. माझी कसली क्षमा मागायची ? इकडच्या सुखाचीहि मी वांटेकरीण आहें अन् दुःखाचीहि वांटेकरीण आहें. इकडच्या दुःखाचा भार सगळा मस्तकावर घेऊन इकडे जर दुःखमुक्त करतां येतं, तर खरोखरच मी फार सुखी झाल्यें असत्यें. उगाच मनाला वाईट वाटून कां घ्यायचं ? हातानं घडलेली चूक आतां लक्ष्यांत आली आहे, तेव्हां आतां आपला लौकिक नष्ट होईल, ही भीतीच नको. आतां गुरुजींनां प्रथम आणायचं अन् आपल्या सगळ्या लोकांनां कळवायचं कीं, आजपासून आपण त्यांच्या पक्षाचे. कामावरून निघून गेलेल्या सर्व कामगारांनां परत बोलावून आणायचं, त्यांनां त्यांच्या कामावर पुनः घ्यायचं अन् या सगळ्या दिवसांचा त्यांनां पगारहि द्यायचा, बरं ?

राजा—आतां अगदीं तूं सांगशील तसें करीन. तुझा हुकूम यापुढें सर्व कामांत चालेल. गुरुजींकडे केव्हांच लोक पाठविले आहेत. जमीदारींतील माझ्या सगळ्या लोकांनांहि तुझ्या ह्मणण्याप्रमाणें जाहीर केलें आहे. एकंदर सर्व कामगारांनां बोलावणें पाठविलें आहे. आपण सर्वजण मिळून मोठा उत्सव करूं. सर्वांजवळ मी उघडपणें क्षमा मागतों. त्या फकिराची मीं अमर्यादा केली आहे, परंतु तो महात्मा मला पुनः भेटेल तर त्याच्या पायाची धूळ मस्तकावर वाहीन–

(इतक्यांत ' वंगभूचा विजय होओ ' हें पद पडद्यांतून ऐकूं येतें.)

राजा—(लक्ष्यपूर्वक ऐकून) अहाहा ! हीच ती पवित्र वाणी. हाच तो महात्मा. माझ्या सुदैवाचा हाच शुभशकून. स्मरण करण्याबरोबर या पुण्यपुरुषाचें दर्शन होण्याचा योग आला, त्याअर्थी त्या कृपाळु परमेश्वरानें पुन्हा मजवर कृपादृष्टि फिरविली, यांत शंका नाहीं. चला, आपण त्या महात्म्याचा यथायोग्य सत्कार करूं.

[जातात.

प्रवेश ४ था.

[स्थळ—पलाशपुरच्या राजवाड्यांत राजसभा भरली आहे. राजा, राजगुरु, फकीर, पुरुषोत्तम, अधिकारीवर्ग, प्रजाजन इत्यादिकांनीं सभागृह भरून गेलें आहे, असा प्रवेश.]

राजगुरु—(राजाच्या मस्तकावर हात ठेवून आशीर्वाद देत) चिरंजीव हो आणि या प्रजेला निरंतर सुख दे. व्हायचें तें होऊन गेलें, त्याबद्दल आतां विषाद मानण्यांत अर्थ नाहीं. आतां स्वधर्मनिरत राहून स्वदेशसेवा कर. परमेश्वर तुझें कल्याण करील.

राजा—(दोन्ही हात जोडून) महाराज, आपली आज्ञा शिरसावंद्य आहे. आपल्या आशीर्वादानें काय होणार नाहीं! (सभाजनांस उद्देशून) अज्ञानानें मजकडून आजवर माझ्या देशबंधूंची अमर्यादा झाली आहे; तरी त्यांनीं मला क्षमा करावी, अशी येथें जमलेल्या सर्व लोकांना माझी विनंति आहे. मातृभूमीची यथाशक्ति सेवा करण्यांत यापुढें मजकडून अंतर होणार नाहीं.

पुरुषोत्तम—मीहि आपणा सर्वांची आज अंतःकरणपूर्वक क्षमा मागतों. खरोखर, माझ्या आजपर्यंच्या निंद्य वर्तनाबद्दल मला अत्यंत दुःख होत आहे. याउपर आपल्या देशाला अहितकर अशी गोष्ट प्राणांतींहि मी करणार नाहीं. माझे अपराध पोटांत घालून सर्वांनीं मला क्षमा करावी.

एक सभाजन—अहा! राजा, धन्य आहे तुझी. आज आमचे सर्व हेतु पूर्ण झाले. आतां तुझ्या देवडीवर पहारेकऱ्याचें काम करण्यांतदेखील आह्मी भूषण मानूं. ईश्वर आमच्या राजाला दीर्घायु करो.

राजा—(फकिरास प्रणाम करून) आपण सत्पुरुष आहां. मला क्षमा करावी.

फकीर—परमेश्वरानेंच आतां तुला क्षमा केली आहे आणि त्याच्याच कृपेनें तुला ही सद्बुद्धि झाली आहे. त्या जगदीश्वराजवळ आतां माझी प्रार्थना इतकीच आहे कीं, त्यानें ही तुझी स्वदेशप्रीति चिरकाल अशीच राहूं द्यावी. देशबंधूंच्या प्रीतीला आणि भक्तीला तूं उत्तरोत्तर अधिकाधिक पात्र व्हावेंस आणि तुझी कीर्ती दिगंतरीं गाजावी. (सभाजनांला उद्देशून) चला, या आनंदाच्या प्रसंगीं

आपण सर्वजण एकवार अंतःकरणपूर्वक आपल्या परमपूज्य मातृभूमीच्या पवित्र नांवाचा जयजयकार करूं याः—

[**चाल**—सुंदरमुख तुंदिलतनु०]

जननि! वंगधरणि! मलयपवनशीतले!
साष्टांग प्रणति तुला शस्यश्यामले! ॥ धृ० ॥
विमलेंदुद्युतिपुलकितयामिनीकुले!
फुल्लकुसुमकांतिशोभिचित्रतरुदले!
कलभाषिणि! हास्यांचितवक्त्रमण्डले!
सुफले! सुजले! विमले!
वरदवरे! असुखहरे! अभयकरे! पुत्रवत्सले! १
सप्तकोटिकंठोत्थितभीमकलरवे!
द्विगुणितभुजसंधृतखरखड्गभैरवे!
सक्रीडोत्पाटितरिपुशीर्षकैरवे!
माते! प्रथिते! तूतें।
ऐशीतें। अबलासें। वदती ते। स्पष्ट मोहिले! २
विद्या तूं, धर्म, मर्म, तूंचि प्राण हा,
हृदयिं भक्ति तूंचि, भुजीं शक्तिही महा,
तूं दुर्गा मंदिरांत धरुनि भुज दहा
प्रबला; । विमला । कमला ।
प्रतिवदनीं। तूं वाणी। ज्ञानखनी। होशि कोमले! ३
सरला तूं सहजस्मितभूषिताननाा,
अतुला तूं सुमफलर्धिसांद्रकानना,
अमला तूं जन्हुसुतासुजलपावना,
जननी । भरणी । धरणी ।
तूं, सकला। तूं सकलां। ह्मणुनि तुझीं। नमित पाउलें! ४

[**शेवटचा पडदा पडतो.**]

वन्दे मातरम् !

सुजलां सुफलां मलयजशीतलाम्
शस्यश्यामलां मातरम् !
शुभ्रज्योत्स्नापुलकितयामिनीम्
फुल्लकुसुमितद्रुमदलशोभिनीम्
सुहासिनीं सुमधुरभाषिणीम्
सुखदां वरदां मातरम् !
सप्तकोटिकंठकलकलनिनादकराले
द्विसप्तकोटिभुजैर्धृतखरकरवाले
के बले मा ? 'तुमि अबले !'
तुमि विद्या तुमि धर्म तुमि हृदि तुमि मर्म
त्वंहि प्राणाः शरीरे
बाहुते तुमि मा शक्ति हृदये तुमि मा भक्ति
तोमारइ प्रतिमा गडि मंदिरे मंदिरे
त्वंहि दुर्गा दशप्रहरणधारिणी
कमला कमलदलविहारिणी
वाणी विद्यादायिनी
नमामि त्वाम्
नमामि कमलां अमलां अतुलाम्
सुजलां सुफलां मातरम्
वन्दे मातरम्
श्यामलां सरलां सुस्मितां भूषिताम्
धरणीं भरणीं मातरम् !
वन्दे मातरम् !

समाप्त.